# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### उंबरवाडी (ता.सुधागड,जि.रायगड) येथील निवृत्त पोलीस कर्मचारी यांच्या कुटुंबांना गावाने वाळीत टाकल्याबाबत

**(१) १९४ (२२-०३-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), अ‍ॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंबरवाडी (ता.सुधागड,जि.रायगड) येथील निवृत्त पोलीस कर्मचारी हाशा नामा हंबीर आणि मांगे या २ कुटुंबांना माहे नोव्हेंबर, २०१९ पासून गावाने वाळीत टाकले असून याप्रकरणी पाली पोलीस ठाण्यात २३ नागरिकांवर माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गाव पंचायतीच्या त्रासाला कंटाळून पिडित कुटुंबातील विवाहित पिंकी मांगे हिने दिनांक ४ नोव्हेंबर, २०१९ रोजी विषप्राशन करुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी न्याय मिळत नसल्यामुळे जिल्हा पोलीस अधीक्षक, अलिबाग, राज्य महिला आयोग, मुंबई आणि महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांचेकडेसुध्दा लेखी निवेदन देऊन लक्ष वेधण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त कुटुंबाना वाळीत टाकणा-यांविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. अनिल देशमुख (१२-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक ०५.११.२०१९ रोजी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून पाली पोलीस ठाणे येथे कॉ.गु.र.नं. ७७/२०१९, भादवि. सह कलम १५३ (अ), ५०४, ५०६, ३४ महाराष्ट्र बहिष्कार प्रतिबंध निषेद व निवारण अधिनियम कलम ५ प्रमाणे १५ आरोपीतांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(२) पिंकी मांगे हीने पोलीस ठाण्यामध्ये केलेल्या तक्रारीत गावपंचांची नावे टाकल्यामुळे गावातील महिलांनी भांडण केले. त्या गोष्टीचा राग आल्याने पिडीत हीने तिचे घरातील फिनेल व युरीया खत प्राशन केले होते.

(३) पोलीस अधीक्षक, रायगड यांनी त्यांना दिलेल्या लेखी निवेदनाची चौकशी करून अहवाल संबंधितांना पाठविला आहे.

(४) i) फिर्यादी व तिचे वडील यांचे कुटुंबीयांना व भावकीला सार्वजनिक ठिकाणी गावात असलेल्या कार्यक्रमात तसेच धार्मिक स्थळे, शाळा, कॅालेज, मंदीर, समाज मंदीर, तलाव, विहीर, नळ, स्मशानभुमी या ठिकाणी येणे जाणेस बंधन घातलेले नसल्याने त्यांना गावपंच व गावकीने सार्वजनिक सोयी सुविधांपासून वंचीत ठेवले नसुन त्यांना वाळीत टाकलेले पोलीस तपासात दिसून येत नाही.

ii) सदर गुन्ह्यातील तपासात आरोपीतांविरूध्द पुरावे आढळून आलेले नाहीत.

iii) सदर गुन्ह्यातील फिर्यादी हीने सदरची फिर्याद ही द्वेषबुध्दीने गावपंच व ग्रामस्थ यांचेविरूध्द दिल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले असल्याने सदर गुन्ह्याचा 'ब फायनल' रिपोर्ट मा. न्यायालयात पाठविण्यात आलेला आहे.

iv) सध्या उंबरवाडी गावात शांतता असुन वाळीत प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यापासून आजपर्यंत ग्रामस्थ व फिर्यादी यांचे कुटुंबीय यांचे मध्ये कोणत्याही प्रकारे वादविवाद झाला नसुन त्यासंदर्भात पाली पोलीस स्टेशनला तक्रार दाखल नाही.

---

## मुंबईमध्ये अनेक बांगलादेशी भाडेकरू अवैधरीत्या वास्तव्य करीत असल्याबाबत

**(२) २६९ (२२-०३-२०२०). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), अॅड.शहाजीबापू पाटील (सांगोले) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिका हद्दीतील कोपरा, खारघर, बेलपाडा, मुर्बी, ओवपेठ, ओवेकँम, ओवे, फरसीपाडा, पापडीचापाडा परिसरातील अनेक घरमालकांच्या घरात बांगलादेशी भाडेकरू अवैधरीत्या वास्तव्य करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरात अनेक रहिवाशांनी कमी पैशात बांगलादेशी महिलांना घर कामासाठी ठेवले असून यापूर्वी करण्यात आलेल्या कारवाईमध्ये भाडेकरू व घरकाम करणा-या महिला बांगलादेशी असल्याचे आढळून आले असून तीन बांगलादेशी नागरिकांना दिनांक १७ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास अटक केली तसेच विरार पश्चिमेकडील अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यांतर्गत दहशतवाद विरोधी पथक व अनैतिक मानवी वाहतूक शाखेने कारवाई करुन २३ बांगलादेशी नागरिकांना दिनांक ११ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास

ताब्यात घेतले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बांगलादेशी नागरिकांना अटक करून त्यांची देखभाल करणे व त्यांना सीमा रेषेवर सोडून येण्यासाठी शासनाकडून अनुदान मिळत नसून स्वतःचे पैसे खर्च करावे लागत असल्यामुळे पोलीसांकडून बांगलादेशी नागरिकांना अटक करण्याकडे दुर्लक्ष होत असून त्यामुळे बांगलादेशी नागरिकांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून बांगलादेशी नागरिकांचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत तसेच बांगलादेशी नागरिकांना अटक करण्याकडे दुर्लक्ष करणा-या पोलीस अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१६-०२-२०२१) :** (१), (२) व (३) नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील पनवेल महानगरपालिकेंतर्गत जानेवारी, २०१९ ते फेब्रुवारी, २०२० या कालावधीत पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे २, खांदेश्वर पोलीस ठाणे येथे १, कामोठे पोलीस ठाणे येथे ३ आणि कळंबोली पोलीस ठाणे येथे २ असे एकूण ८ गुन्हे बांग्लादेशी नागरिकांबाबत दाखल आहेत.

दिनांक १२ फेब्रुवारी २०२० रोजी पालघर जिल्हयातील विरार पश्चिमेकडील अर्नाळा पोलीस ठाणे हद्दीतील रजोडी गावात २२ बांग्लादेशी नागरीक अवैधरित्या वास्तव्य करीत असल्याचे आढळुन आले, सदर बांग्लादेशी नगरीकांवर अनैतिक मानवी वाहतुक शाखा व दहशतवाद विरोधी कक्ष पालघर यांनी संयुक्तपणे कार्यवाही करुन आरोपीत यांचे विरुध्द अर्नाळा पोलीस ठाणे गु.र.क्र.४८/२०२० भारतीय पासपोर्ट अधिनियम १९२० चे कलम (३)अ, ६(अ), सह विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम १४ प्रमाणे गुन्हा दाखल करुन सदर गुन्हयातील एकूण २२ आरोपीत यांना दि.१२.०२.२०२० रोजी अटक करुन मा. न्यायालयात हजर केले नंतर मा.न्यायालयाने आरोपीत यांना दि.१४.०२.२०२० रोजी जामिनावर सोडले आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.

बांग्लादेशी नागरिक बेकायदेशीर रित्या अवैध वास्तव्य करीत असल्याचे आढळल्यास त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात येते. सन २०१८ मध्ये १३८ तर २०१९ मध्ये २०५ व सन २०२० मध्ये (सप्टेंबर अखेर) ५७ अवैध बांग्लादेशींना हद्दपार करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात प्रदर्शित होणाऱ्या मराठी चित्रपटांना सिनेमागृह उपलब्ध होणेबाबत**

**(३) ९५२ (२७-०३-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेष करुन मुंबईत प्रदर्शित होणाऱ्या मराठी चित्रपटांना सिनेमागृह उपलब्ध होणेबाबत तसेच निर्मात्यांना स्वतंत्र स्टुडीओची निर्मिती करणेबाबत कोणतीही व्यवस्था नसल्याने मराठी चित्रपटांवर सिनेमागृह मालकांकडून अन्याय होत असल्याची बाब माहे

जानेवारी २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास मुंबई शहर, उपनगरात एकूण किती चित्रपटगृहे कार्यान्वीत आहेत व त्यापैकी किती चित्रपटगृहामंध्ये मराठी सिनेमा प्रदर्शित करणेबाबत शासनाने नियमात तरतुद केली आहे,
(३) असल्यास प्रत्यक्षात एकूण किती चित्रपट गृहामध्ये अद्यापही मराठी चित्रपट दाखविण्यात येत नसल्याचे आढळून आले आहे व त्यानुसार अशा सिनेमागृह मालकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१२-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

तथापि, मराठी चित्रपट निर्मितीस चालना मिळण्यासाठी दर्जेदार चित्रपट अनुदान योजनेअंतर्गत अ-दर्जा प्राप्त चित्रपटास रुपये ४०.०० लक्ष व ब-दर्जा प्राप्त चित्रपटास रुपये ३०.०० लक्ष असे अनुदान देण्यात येते. याशिवाय, महामंडळाच्या परिसरात चित्रीकरण करणा-या निर्मिती संस्थांना भाडे आकारणीत ५० टक्के सवलत दिली जाते.
(२) मुंबई शहर व उपनगरात एकुण १३४ चित्रपटगृहे आहेत. राज्यातील सर्व संबंधित परवाना प्राधिकारी यांना वर्षातून किमान ४ आठवडे मराठी चित्रपट प्रदर्शित करण्याबाबत सुचित करण्यात आलेले आहे.

सिनेमा ओनर्स ॲन्ड एक्झिबिटर्स असोसिएशन ऑफ इंडीया यांनी रिट याचिका क्र. ५००/२००९ अन्वये मा. उच्च न्यायालयात आव्हान दिलेले असता, सदर याचिकेवर दिनांक १५/०६/२०१० रोजी न्यायालयाने वर्षभरात एकुण ४४ शो मराठी चित्रपट प्रदर्शित करण्याबाबत अंतरिम आदेश दिले आहेत. सदर आदेश विचारात घेऊन पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी सर्व चित्रपटगृह परवानाधारकांना दिनांक २८/०७/२०१० च्या पत्रान्वये मराठी सिनेमाचे वर्षभरात एकुण ४४ शो प्रदर्शित करण्याबाबत सुचीत करण्यात आलेले आहे.
(३) सद्यस्थितीत, कोणत्याही चित्रपटगृहांमध्ये मराठी चित्रपट दाखविण्यात येत नसल्याचे आढळुन आलेले नाही.

शासनपत्र, क्र. बीसीआर-५३२००२/२६/विशा-५, दिनांक १४ जुन, २००२ अन्वये चित्रपट परवाना नुतनीकरण करताना चित्रपटगृहात मराठी चित्रपट प्रदर्शित करण्यात आले अथवा नाही, याबाबत खात्री करुन परवाना नुतनीकरण करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथे घरात घुसून जाळपोळ केल्याबाबत.**

**(४) ११७६ (२०-०३-२०२०). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील मध्यवर्ती पोलीस ठाण्याच्या हद्दित एका महिलेच्या घरात घुसून तुझ्या मुलीशी लग्न लावून दे असे म्हणून एका तरुणाने घरात आग लावल्याचे दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मध्यवर्ती ठाणे पोलिसांनी सदर तरुणास अटक केली असून सदर घटनेमुळे महिला व मुलगी घाबरली असून परिसरातील महिलांमध्येही भितीचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उल्हासनगर शहरात हत्या, अपहरण करणे, महिलांचे मंगळसूत्र खेचणे, घरफोडी इत्यादी घटना वारंवार घडत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच अशा प्रकारांना कायम स्वरूपी आळा घालण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अनिल देशमुख (११-०२-२०२१) :** (१) होय.

(२) श्रीमती कमल भिम मारोतीया यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मध्यवर्ती पोलीस स्टेशन, उल्हासनगर-३ येथे दिनांक २९.१२.२०१९ रोजी गु,र.नं.५८९/२०१९ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. गुन्ह्यातील आरोपीस त्याच दिवशी अटक करण्यात आली असून दिनांक ०१.०४.२०२० रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.

फिर्यादी व आरोपी हे एकाच परिसरात राहणारे असल्यामुळे एकमेकांचे ओळखीचे आहेत. सदर घटनेमुळे परिसरातील महिला व मुली यांच्यामध्ये भितीचे वातावरण पसरलेले नाही. तरीही सदर परिसरात योग्य पोलीस गस्त ठेवण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही.

सन २०१९ च्या तुलनेत अपहरणाच्या गुन्ह्यात ९२, मंगळसूत्र खेचणे-२०, व घरफोडी-११४ गुन्ह्याची घट नोंदविलेली आहे. हत्येसारख्या गुन्ह्यात ७ ने वाढ दिसून येत असली तरी सन २०२० मधील एकूण २४ गुन्ह्यापैकी १० गुन्हे घरातील/जवळच्या नात्यातील घरगुती भांडणातून तात्कालिक कारणामुळे केलेल्या हत्येबाबतचे आहेत.

(४) उल्हासनगर शहरात हत्या, अपहरण, मंगळसूत्र खेचणे, घरफोडी या प्रकारांना आळा घालण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

१) प्रत्येक पोलीस ठाण्याच्या हद्दीत महत्वाच्या ठिकाणी दिवस/रात्री नियमितपणे फिक्स पॉईंट,पेट्रोलींग, नाकाबंदी नेमण्यात येत आहे.

२) उल्हासनगर शहाराच्या हद्दीतील सर्व बँका, एटीएम सेंटर, ज्वेलर्स दुकाने, इतर दुकाने, प्रमुख रस्ते,, सोसायटी या ठिकाणी सीसीटिव्ही कॅमेरे लावून सुरक्षा रक्षक नेमण्याबाबत सूचना

देण्यात येत आहेत.तसेच ब-याच सार्वजनिक ठिकाणी महानगरपालिका व पोलीस यंत्रणेमार्फत सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून आणखी बरेच ठिकाणी सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्याचे काम चालू आहे.

३) शांतता कमिटी, मोहल्ला कमिटी तसेच महिला दक्षता कमिटी यांच्यासोबत घेण्यात येत असलेल्या बैठकांमध्ये वरीलप्रमाणे गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात आणून देऊन त्याकरिता घ्यावयाच्या दक्षतेबाबत सूचना देण्यात येतात.

४) क्रियाशील गुन्हेगार व अटक आरोपी यांच्याविरोधात नियमातील तरतूदीनुसार प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कफ परेड (मुंबई) येथील एका फ्लॅटमध्ये पोकर जुगार खेळतांना वकिलासह अन्य आठ नागरिकांना अटक केल्याबाबत**

**(५) १६४७ (२२-०३-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हायलाइट्स गुन्हे शाखेच्या पथकाने कफ परेड (मुंबई) येथील एका फ्लॅटमध्ये पोकर जुगार खेळतांना दिनांक २३ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मुंबई उच्च न्यायालयाच्या ज्येष्ठ वकिलासह अन्य आठ नागरिकांना अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीनुसार काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१२-०२-२०२१) :**

(१) प्रस्तुत नमुद गुन्हयात अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये २ वकीलांचा समावेश आहे.

(२) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन मुंबई पोलीस गुन्हे शाखेच्या पथकाने कफ परेड पोलीस ठाणे येथे वि. स्था. गु.र.क्र. १७/२०१९ कलम ४ (अ), ५ महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम अन्वये नमुद फ्लॅट धारक यांच्यासह इतर ७ इसमांवर गुन्हा नोंदविण्यात आला असुन सदर गुन्हयांमध्ये ८ आरोंपीना अटक करण्यात आली होती. सदर प्रकरणी दाखल गुन्हा जामीनपात्र असल्याने लायक जामीनदार व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता झाल्यानंतर आरोपींना जामीनावर मुक्त करण्यात आले आहे.

(३) सद्य:स्थितीत, गुन्हा तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भंडारा जिल्ह्यातील सिटी सर्वे करून पट्टेधारकांना मालकी हक्क देण्याबाबत

**(६) २१८९ (२२-०३-२०२०). श्री.राजू कारेमोरे (तुमसर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यात सन १९७३ या कालावधीत २००० किंवा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांचा सर्व्हे करुन केवळ १० टक्के गावांतील घरमालकांना निवासी जागेची आखिव पत्रिका व प्रापर्टी कार्ड देण्यात आले असून ९० टक्के गावांचा अद्यापही सर्व्हे करण्यात आला नसल्याचे माहे नोव्हेंबर वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे या गावातील लोकांना घर असूनही राष्ट्रीयकृत बँका गृहकर्ज देत नसून घराची खरेदी-विक्री सुद्धा करता येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गावांचा सर्व्हे करून त्यांच्या सात-बारावरील सरकार ही नोंद कमी करुन जमिन मालकांना मालकी हक्क देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बाळासाहेब थोरात (२८-०१-२०२१) :** (१), (२) व (३) भंडारा जिल्ह्यात सन १९७३ मध्ये २००० किंवा जास्त लोकसंख्या असलेले भंडारा जिल्ह्यातील १४१ गावांपैकी १०३ म्हणजे ७३% गावांचे नगर भुमापन काम पुर्ण होऊन संबंधितांना त्यांच्या मिळकतीचे आखिव पत्रिका, प्रॉपर्टी कार्ड देण्यात आलेली आहे. तर उर्वरित ३८ म्हणजेच २७ % गावाचे नगर भूमापनाचे काम पूर्ण होणे शिल्लक आहे. भाडेपट्टयाने दिलेल्या/वर्ग-२ असल्यास गृहकर्ज घेतांना अथवा घराची खरेदी विक्री करतांना म.ज.म.सं.१९६६ (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ मधील अटी व शर्तीनुसार शासनाची पुर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.

शासन अधिसुचना दिनांक ८ मार्च २०१९ अन्वये भोगवटदार वर्ग-२ आणि भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या जमिनी भोगवटदार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली. त्याअन्वये भंडारा जिल्ह्यातील १६ प्रकरणात कार्यवाही करण्यात आली.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मालवण (जि.सिंधुदुर्ग) समुद्रात मच्छिमारांच्या नौकेच्या जाळीचे केलेले नुकसान

**(७) २२११ (२२-०३-२०२०). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) येथे समुद्रात मच्छिमारीसाठी गेलेल्या मच्छिमारांच्या नौकेची जाळी समुद्रात पसरलेली असतांना सुमारे ६० हायस्पीड बोटींच्या समुहाने सदर जाळी बोटी बरोबर ओढून नेल्याने जाळ्यांचे झालेले नुकसान या प्रकरणी मालवण पोलीस ठाण्यात मच्छिमारांनी तक्रार नोंदवून गुन्हा दाखल करावा अशी मागणी माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने या ६० हायस्पीड बोटींच्या मालकांवर पोलीसांनी गुन्हा नोंदवून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अनिल देशमुख (११-०२-२०२१) :**

(१) दिनांक १६/०१/२०१९ रोजी फिर्यादी कृष्णा चंद्रकांत आचरेकर, रा.सर्जेकोट मियांबांध, ता.मालवण हे सर्जेकोट बंदरासमोरील समुद्रात सुमारे ११.५ वाव पाण्यात एकूण २४ जाळी टाकून मासेमारी करीत असतांना RUKKU (२) नावाचा मासेमारी ट्रॉलर रजिस्टर नं.माहित नाही. त्यावरील ३ ते ४ अनोळखी पुरुष इसम (नाव व पत्ता माहिती नाही) यांनी मासेमारी जाळी चोरुन नेली म्हणून तक्रार दिलेली आहे.

तक्रारीत सुमारे ६० हायस्पीड बोटीच्या समुहाने सदर जाळी बोटींबरोबर ओढून नेली या बाबत नमूद नाही.

(२) सदर प्रकरणी मालवण पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं.८८/२०१९ भादंवि कलम ३७९ प्रमाणे दाखल आहे.

गुन्हयांचे तपसामध्ये मत्स्यविभाग मालवण तसेच बंदर विभाग यांचेकडेही RUKKU (II) नावाच्या ट्रॉलर बद्दल माहिती घेता त्यांचेकडून माहिती उपलब्ध झालेली नाही.

एकंदरीत गुन्हयांचे तपसामध्ये फिर्यादी याने नमूद केलेल्या RUKKU (२) नावाच्या मासेमारी ट्रॉलर संदर्भात ट्रॉलरचे नाव, नंबर हे उघडकीस न आल्याने गुन्हा निरंतर तपासावर ठेवून दिनांक १७/१२/२०१९ रोजी मा.न्यायालयात “अ” फायनल पाठविण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**माहिम (मुंबई) येथे वृध्द दाम्प्त्याचे सोन्याचे दागिने तोतया पोलिसांनी लुटल्याबाबत**

**(८) २२९० (२२-०३-२०२०). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहिम (मुंबई) येथे शिवाजी पार्क मैदानावर मॉर्निंग वॉकसाठी जाणाऱ्या वृध्द दाम्प्त्याचे १२ तोळे सोन्याचे दागिने तोतया पोलिसांनी लुटल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी पोलिसांनी चौकशी करुन तोतया पोलिस लुटारुंना अटक केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार त्यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (११-०२-२०२१) :** (१) होय.

सदर बाबत माहिम पोलीस ठाणे येथे दिनांक ०२.०१.२०२० रोजी गु.र.क्र.०२/२०२० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२), (३) व (४) अद्याप अटक झालेली नाही.

नमुद गुन्ह्याच्या तपासात घटना स्थळाजवळ असलेल्या कंस्ट्रक्शन साईटवर असलेले सी.सी.टी.व्ही. कॅमे-याचे सी.सी.टी.व्ही. फुटेज प्राप्त करुन तपास केला असता, प्राप्त माहितीनुसार सदर आरोपी लाला व कासम, राहणार इराणी वस्ती आंबिवली, कल्याण, जिल्हा ठाणे अशी अपूर्ण माहिती प्राप्त झाली. स्थानिक पोलीसांच्या मदतीने सदर आरोपीचा दिनांक ०९.०१.२०२० रोजी नमूद इराणी परिसरात शोध घेतला असता त्यावेळी नमूद दोन्ही आरोपी तेथून फरार झाले. खबरींकडून माहिती घेऊन उक्त परिसरात ३ वेळा तपास केला असता आरोपी मिळून आलेले नाहीत. स्थानिक पोलीस ठाणे खडकपाडा, कल्याण, जि.ठाणे येथील पथकास माहिती दिली असून स्थानिक पोलीसांची मदत घेऊन आरोपींना अटक करण्याचे प्रयास सुरु आहे.

---

### उमरगा (जि.उस्मानाबाद) येथील पोलीस स्टेशनमधील पोलीसांच्या रिक्त पदांबाबत

**(९) २४०४ (१४-०३-२०२०). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरगा (जि.उस्मानाबाद) येथील पोलीस स्टेशनमधील पोलीसांच्या मंजूर असलेल्या १०६ पदांपैकी २६ पदे सध्या रिक्त असून केवळ ८० पोलीस कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पोलीस स्टेशनच्या हद्दीत उमरगा शहरासह ७३ गावे असल्याने रिक्त पदांमुळे पोलीस यंत्रणेवर अतिरिक्त ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची रिक्त पदे भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (०२-०२-२०२१) :** (१) व (२) नाही, उमरगा (उस्मानाबाद) येथील पोलीस स्टेशनमधील एकूण मंजूर पदे १०६ असून, सध्या कार्यरत ९६ आहेत. १० पदे रिक्त आहेत. पोलीस स्टेशनच्या हद्दीत दाखल असलेले गुन्हे, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न इत्यादीबाबतचा आढावा घेऊन आवश्यक तेवढया पोलीस कर्मचा-यांची नेमणूक करण्यात आली आहे.

(३) रिक्त पदे भरण्याची बाब कार्यवाहीधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोरचांदली (ता. मुल, जि.चंद्रपूर) येथील अवैध जुगार अड्डा बंद करण्याबाबत**

**(१०) २८१० (२२-०३-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरचांदली (ता. मुल, जि.चंद्रपूर) येथील अवैध जुगार अड्डा बंद करण्याबाबत विधानसभा सदस्य, बल्लारपूर यांनी पोलिस अधिक्षक चंद्रपूर यांना दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अनिल देशमुख (२९-०१-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अनुबाई बहुउद्देशीय सामाजिक संस्था बोरचांदली, ता.मुल, जि.चंद्रपूर या संस्थेच्या कार्ड रुम/कार्ड क्लबची अनुज्ञप्ती क्र.GB/D-VIII-T-२/२०१५-१ दिनांक २५/०३/२०१५ ची परवाना मुदत दिनांक ३१/१२/२०२० पर्यंत वैध आहे. सदरचा क्लब सन २०१९ पासून ते आजपावेतो बंद आहे.

सदर संस्था ही सन २०१९ पासून ते आजपर्यंत बंद असल्याने तेथे कोणतेही गावातील व्यक्ती, शाळेकरी मुले किंवा बाहेरील व्यक्ती त्या संस्थेमध्ये जात नाहीत.

पो. स्टे. मुल हद्दीतील मौजा बोरचांदली तसेच आजुबाजुच्या परिसरात कोणत्याही प्रकारचा अवैध जुगार चालणार नाही यासाठी नियमित पणे गावांना भेटी देवून, पोलीस पाटील, गावकऱ्यांकडून माहिती काढण्यात येत असते. तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी, मुल आणि पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर यांना सुध्दा सदरचे ठिकाणी कोणत्याही प्रकारचे अवैध जुगार चालणार नाही यासाठी वेळोवेळी अचानक भेट देवून तसेच गोपनीय सुत्राकडून माहिती काढून कार्यवाही करण्याबाबत निर्देशित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र-कर्नाटक सिमा प्रश्नामुळे कोल्हापूरात तणावपुर्ण वातावरण निर्माण झाल्याबाबत**

**(११) ३३८१ (२७-०३-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्नाटक नवनिर्माण सेनेच्या नेत्याने महाराष्ट्र एकीकरण समितीच्या नेत्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य केल्यामुळे कोल्हापूर येथे त्याचे तीव्र प्रतिसाद उमटले असून दिनांक २९ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास कोल्हापूरात निषेध मोर्चा काढण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१६-०२-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.

(२) कर्नाटक नवनिर्माण सेनेच्या नेत्याने महाराष्ट्र एकीकरण समितीच्या नेत्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य केल्यामुळे कोल्हापूर जिल्हयातील विविध पोलीस ठाणे हद्दीमध्ये विविध ठिकाणी निषेध मोर्चे काढण्यात आले. सदर मोर्चाचे अनुषंगाने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून कोल्हापूर जिल्हयातील सर्व पोलीस ठाणे हद्दीध्ये पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. त्यामुळे सदर मोर्चा व आंदोलना दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला नाही.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**मुंबईत माथाडी कामगारांच्या कापड बाजार व दुकान मंडळाच्या ठेवींचा अपहार केल्याबाबत**

**(१२) ३७३८ (२३-०३-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत माथाडी कामगारांच्या कापड बाजार व दुकान मंडळाच्या ५ कोटीच्या ठेवीचा अपहार केल्या प्रकरणी इंडियन ओव्हरसीज बँकेच्या साकीनाका शाखेच्या तत्कालीन व्यवस्थापकास आणि त्याच्या सहकाऱ्यास साकीनाका पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी दिनांक १० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणातील आरोपीस सन २०१६ या कालावधीत कल्याण येथील माथाडी मंडळाच्या १० कोटी रुपयाच्या अपहार प्रकरणी अटक करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधीत दोषीविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (११-०२-२०२१) :** (१) होय

(२) हे अंशतः खरे आहे.

खडकपाडा पोलीस ठाणे,कल्याण येथे गु.र.क्र.२४१/१६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात आरोपी नामे मुबारक वाहित पटेल यास अटक करण्यात आली आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी साकीनाका पोलीस ठाणे, अंधेरी येथे गु.र.क्र.९४५/२०१६ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सदर गुन्हयात ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. नमुद गुन्हयात एकूण ६,८१,५००/- इतकी रक्कम आरोपी नामे त्रिभुवनसिंग यादव यांचेकडून हस्तगत करण्यात आली असून सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

(५) प्रश्न उद्भभवत नाही.

---

**भोकरदन (जि.जालना) पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध प्रकारचे गुन्हे घडल्याबाबत**

**(१३) ३९३९ (१४-०३-२०२०). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरदन (जि.जालना) पोलीस ठाण्याच्या हद्दीत सन २०१९ या कालावधीत विविध प्रकारचे २६३ गुन्हे घडले असून त्यापैकी ९५ चोऱ्या व ०८ घरफोडीच्या घटना घडल्या असून केवळ ०१ घरफोडीच्या व ३० चोऱ्यांच्या तपासात पोलिसांना यश आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अपुऱ्या पोलीस बलामुळे गुन्हेगारींच्या घटनाचा तपास लावणे व त्याला आळा घालणे कठीण होत आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भोकरदन पोलीस स्टेशन मधील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (०१-०२-२०२१) :** (१) सन २०१९ मध्ये घरफोडी या सदराखाली ०८ गुन्हे दाखल असून त्यापैकी ०१ गुन्ह्यात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. ०६ गुन्हे कायम तपासावर ठेवून तुर्त गुन्ह्यात 'अ' फायनल समरी पाठविली असून ०१ गुन्हा तपासावर प्रलंबित आहे. तसेच चोरी यासदराखाली ९५ गुन्हे दाखल असून त्यापैकी ३० गुन्हे उघडकीस आले आहेत. उर्वरीत ६० गुन्हे कायम तपासावर ठेवून तुर्त गुन्ह्यात अ फायनल समरी पाठविली आहे. ०५ गुन्हा तपासावर प्रलंबित आहे.

सन २०१९ मध्ये भोकरदन तालुक्यात एकूण ४५३ गुन्हे दाखल असून त्यापैकी ३४४ गुन्हे उघडकीस आले आहेत.

उघडकीस न आलेल्या गुन्ह्याचे बाबतीत प्रत्येक गुन्हे परिषदे दरम्यान आढावा घेवून गुन्हे उघडकीस आणण्याच्या दृष्टीने संबंधित पोलीस अधिकारी यांना सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच मालाविरुद्धचे गुन्हे उघडकीस आणण्याच्या दृष्टीने पो. नि. स्था.गु.शा. यांच्या अधिपत्याखाली जिल्हास्तरावर पथक स्थापन करण्यात आले आहे.

(२) भोकरदन तालुका हद्दीत भोकरदन, हसनाबाद व पारध हे तीन पोलीस स्टेशन असून तीनही पोलीस स्टेशन येथे एकूण ०८ अधिकारी व ८८ कर्मचारी यांची नियुक्ती आहे. उपलब्ध मनुष्यबळातून गुन्ह्याचा तपास व कायदा व सुव्यवस्था परिस्थिती हाताळण्याबाबत वेळोवेळी मार्गदर्शन करुन आवश्यक कार्यवाही करण्यात येते.

(३) पोलीस शिपाई संवर्गातील १००% भरतीसाठी मंत्रीमंडळाने मान्यता दिली असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सूरू अहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**घाटकोपर (मुंबई) येथे हत्या केलेल्या महिलेच्या शरीराचे तुकडे सापडल्याबाबत**

**(१४) ३९९७ (२४-०३-२०२०). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटकोपर (मुंबई) येथे हत्या केलेल्या महिलेच्या शरीराचे तुकडे सापडले असल्याची खळबळजनक बाब दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेच्या काही दिवसांपूर्वीच माहीम काठावर शरीराचे तुकडे केलेले शव व एका व्यक्तीने आपल्या मुलीच्या शवाचे तुकडे करून शव फेकून दिल्याचे घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहर व जवळपासच्या विभागात सुरु असलेल्या अशा घटनांमुळे सामान्य नागरिक, महिला व पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (११-०२-२०२१) :** (१) होय

(२) नाही. परंतू माहिम पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०२.१२.२०१९ रोजी मगदुमशाह बाबा दर्ग्याच्या मागे समुद्रकिनारी एक मानवी अवयव सापडल्याने अज्ञात इसमाविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(३) नाही. वर नमुद गुन्हयातील आरोपींना तात्काळ अटक करण्यात आली असून दोन्ही खून हे जवळच्या नातेवाईकांनी केले असल्याचे तपासाअंती निष्पन्न झाले आहे. त्यांच्याविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात येत आहे.

(४) घाटकोपर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.८९८/२०१९ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. नमूद गुन्हयाच्या तपासात महिला श्रीमती बदरुनिसा शफी शेख हिस तिचा मुलगा सोहेल मो.शफी शेख याने घरगुती वादातून खून केल्याचे कबूली दिली आहे. त्यास दिनांक ०९.०१.२०२० रोजी अटक करण्यात आली असून गुन्हयाचा तपास चालू आहे.

माहिम पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०२.१२.२०१९ रोजी मगदुमशाह बाबा दर्ग्याच्या मागे, समुद्रकिनारी एक मानवी अवयव सापडल्याने अज्ञात इसमाविरुध्द माहिम पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.४११/२०१९ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. गुन्हयाच्या तपासात यातील अनोळखी मयत इसमाची ओळख पटून त्याचे नाव बेनेट लेसले रिबेलो वय ५९ वर्षे समजून आले. तसेच मयत इसमाची मानस कन्या भाविका जितेंद्र जोगळे उर्फ आराध्या जितेंद्र पाटील उर्फ रिया बेनेट रिबेलो व तिचा मित्र सोमेश बापू कसबे तसेच आरोपी अलीमियॉ उमरमियॉ चाऊस यांनी गुन्हेगारी कट रचून बेनेट रिबेलो यांचा खून केल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच खून केल्यानंतर सदर मृतदेहाची विल्हेवाट लावण्याकरीता अटक आरोपी अलिमियॉ चाऊस याने मदत केली आहे. तपासामध्ये या गुन्हयाच्या कलमांमध्ये भा.द.वि. कलम १२०(ब) हे कलम समाविष्ट करण्यात आले आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथे पोलीस अधिकारी यांनी कर्तव्यात कसूर केल्यामुळे पिडित महिलेने आत्महत्या केल्याबाबत**

**(१५) ४०६२ (२४-०३-२०२०). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे कौटुंबिक व लैंगिक अत्याचार केलेल्या महिलेची तक्रार दाखल करून घेणे व त्याबाबत तपासणी करण्याच्या कामात हलगर्जीपणा केल्यामुळे सदर महिलेने आत्महत्या केल्याची गंभीर घटना दिनांक २३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नये यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१६-०२-२०२१) :**

(१) होय, हे अशंत: खरे आहे. सदरची घटना दिनांक १८.०१.२०२० रोजी चांदोरी नागापूर, ता.निफाड, जि.नाशिक येथे घडलेली आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणी सहायक पोलीस निरिक्षक श्री.अनिल केशव जगताप, नेमणूक इंदिरा नगर पोलीस ठाणे यांना मा.पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांच्या दिनांक ०६.०२.२०२० रोजीच्या आदेशान्वये सदर महिलेच्या आत्महत्येस कारणीभूत झाल्याने सायखेडा पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण येथे दाखल गुन्ह्याचे संबंधाने निलंबन आदेश जारी केलेला आहे. तसेच मा.पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांच्या आदेशान्वये पोलीस निरिक्षक महेंद्र ओंकार चव्हाण व सहायक पोलीस निरिक्षक अनिल केशव जगताप यांचेविरुध्द सदर प्रकरणी प्राथमिक चौकशी सुरु करण्यात आली आहे.

अशा प्रकारच्या घटना घडू नये याकरिता पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांनी गुन्हे आढावा बैठकी दरम्यान सर्व पोलीस उपआयुक्त व पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक व इतर अधिकारी यांना महिलांबाबत आलेल्या तक्रारीचे गांभीर्याने दखल घेऊन, सौजन्याने वागणे व तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहे. नाशिक पोलीस आयुक्तालयाकडून महिलांबाबत घडणाऱ्या अपराधांना प्रतिबंध होण्याकरिता एकूण ८ निर्भया पथक स्थापन करण्यात आले आहे. तसेच तक्रार निवारण दिनी महिलांच्या तक्रारीला प्राधान्य देवून तक्रारींचे निवारण केले जाते. महिलांचे तक्रारींकरिता १०९१ टोल फ्री क्रमांकाची सुविधा २४X७ उपलब्ध करण्यात आलेली असून त्यावर आलेल्या प्रत्येक कॉलचे गांभीर्याने दखल घेऊन तात्काळ कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मागाठाणे (मुंबई) विधानसभा क्षेत्रात गर्र्दुल्ले, चर्सी व चोरांपासून तेथील स्थानिकांना होत असलेल्या त्रासांबाबत**

**(१६) ४२९७ (२४-०३-२०२०). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागाठाणे (मुंबई) विधानसभा क्षेत्रातील देवीपाडा हायवेलगत तसेच रहेजा, कुलूपवाडी व ठाकूर व्हीलेज येथील गर्दुल्ले, चर्सी व चोरांपासून तेथील स्थानिकांना त्रास होत असल्याबाबतची तक्रार माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधीनी पोलिस स्थानकांत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पोलिस प्रशासनाने कोणती कारवाई केली आहे,

(३) असल्यास, असे प्रकार रोखण्याकरिता कायमस्वरूपी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (११-०२-२०२१) :** (१) होय.

(२) परिमंडळ-१२ मुंबई च्या अधिपत्याखालील कस्तुरबा मार्ग व समतनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील देविपाडा हायवे लगत, तसेच रहेजा कुलुपवाडी आणि ठाकूर व्हिलेज परिसरात सन २०१९ मध्ये ९३१ गुर्दुल्यांवर कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच समतानगर व कस्तुरबामार्ग पोलीस ठाण्यामध्ये सन २०१९ मध्ये १८ गर्दुल्यांवर कारवाई करण्यात आली व एकूण १७ चोरीचे गुन्हे दाखल असून त्यापैकी ९ गुन्हे उघड आहेत. सदर गुन्ह्यामध्ये १२ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

(३) देविपाडा हायवे लगत, रहेजा कुलुपवाडी आणि ठाकूर व्हिलेज या ठिकाणी पोलीसांची दिवस-रात्री गस्त ठेवण्यात आली आहे. सदर परिसरात गर्दुल्ले, चरसी मिळून आल्यास त्यांच्यावर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. सदर परिसरात कॉर्नर मिटींग घेऊन नागरिकांना सतर्क राहण्याबाबत तसेच काही अनुचित प्रकार दिसून आल्यास तात्काळ पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत तसेच जनजागृती करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यामध्ये गावठी पिस्तुलाची अवैधरित्या विक्री होत असल्याबाबत**

**(१७) ४३२९ (२४-०३-२०२०). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवैधरित्या गावठी पिस्तुलाची विक्री करताना तिघांना सापळा रचून जेरबंद केल्याची घटना माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी त्यांच्याकडून पिस्तुले जिवंत काडतुसे असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा प्रकारे अवैधरित्या पिस्तुलाची खरेदी विक्री करण्याचे प्रकार यापूर्वी घडले आहेत काय,
(४) असल्यास, शासनाने अशा प्रकारावर आळा घालण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अनिल देशमुख (११-०२-२०२१) :** (१) होय.
(२) होय

या गुन्ह्यातील ३ आरोपींकडून २ गावठी पिस्टल व ४ जिवंत काडतुसे असे एकूण १,००,४००/- रु. किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
(३) अशा प्रकारे अवैधरित्या पिस्टलची खरेदी-विक्री करण्याचे उद्देशाने यापूर्वी सन २०१८ व २०१९ मध्ये गुन्हे दाखल नसल्याने माहिती निरंक आहे.
(४) पोलीस ठाणे स्तरावर गुन्हे शोध पथके तयार करण्यात आली आहे. बातमीदारामार्फत अशा प्रकारच्या गुन्ह्यांची माहिती घेवून वेळीच अशा गुन्ह्यांना पायबंद घातला जात आहे. स्थानिक गुन्हे शाखेमार्फत जिल्ह्यामध्ये अशा प्रकारचे गुन्हे करणारे गुन्हेगारांना शोधून कारवाई करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया येथे विद्यार्थिनीवर ॲसिड हल्ला झाल्याबाबत**

**(१८) ४५८७ (२४-०३-२०२०). श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.राजू कारेमोरे (तुमसर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया येथे अभियांत्रिकी विद्यालयात शिकत असलेल्या मुलीवर ॲसिड हल्ला झाला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी आढावा बैठकीत मा. मुख्यमंत्री यांनी आरोपींवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांच्या आदेशाप्रमाणे आरोपींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अनिल देशमुख (१२-०२-२०२१) :**
(१) व (२) होय, गोंदिया जिल्ह्यातील मौजा खळबंदा येथील प्रियदशनी अभियांत्रिकी विद्यालयात शिक्षण घेत असलेली कु. आचल कैलास कांबळे, वय २० वर्ष हिचेवर दिनांक १८/१२/२०१९ रोजी एकतर्फी प्रेमातून पोलीस ठाणे गंगाझरी अंतर्गत मौजा मुंडीपार येथे ॲसिड

हल्ला झाल्याची घटना घडली आहे.

(३) पिडीत मुलीच्या जबाबावरुन पोलीस ठाणे गंगाझरी येथे अपराध क्र.२३२/२०१९ कलम ३२६, ३२६(अ), ३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी दोन आरोपींना अटक करुन पोलीस कोठडी रिमांड घेवून तपास करण्यात आला आहे. तपासामध्ये सबळ पुरावे गोळा करुन त्यांचे विरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. प्रकरण न्याय प्रविष्ट आहे.

सदर प्रकरणातील पिडीत मुलीस मा.मुख्यमंत्री व पंतप्रधान योजने अंतर्गत प्रत्येकी १ लाख रुपये, मनोधैर्य योजनेअंतर्गत दिनांक ३०/१२/२०१९ रोजी ३० हजार रुपये व दिनांक ०४/०९/२०२० रोजी २ लाख २० हजार रुपये आर्थिक मदत देण्यात आली असून सदर पिडीत मुलीच्या नावाने १० वर्षाकरीता रु.७,५०,०००/- फिक्स डिपॉझीट करण्यात आले आहे. अशी एकूण रु. १२,००,०००/- आर्थिक मदत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला शहरात एनआरसी व सीएए विरोधात मोर्चाचे आयोजन केल्याबाबत**

**(१९) ४८७० (२५-०३-२०२०). श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.नितीन भिकनराव देशमुख (बाळापूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरात एनआरसी व सीएए विरोधात भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी काही समाजकंटकांनी थेट वाहनांची तोडफोड करून दहशत पसरविण्याचा प्रयत्न केल्याची घटना माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वाहन तोडफोडी दरम्यान एक वृद्‌ध महिला व लहान मुलगी थोडक्यात बचावली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातील ज्या मालमत्ताधारकांचे नुकसान झाले आहे त्यांनी पोलीस प्रशासनाकडे समाजकंटकांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू समाजकंटकांना अटक करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१६-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही.

(३) व (४) सदर घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने कोतवाली शहर पोलीस स्टेशन येथे नं.३५१/१९ कलम १४३, १४७, १४८, १४९, ३५३, ३३२, ३२४, ३४१, ४२७, ३३६, ४२७ भादंवि कलम ३ सार्वजनिक मालमत्ता नुकसान अधिनियम १९८४ व कलम ७ क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट १९३२ नुसार गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यांमध्ये ८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सध्या ते जामिनावर असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उत्तर सोलापूर (जि.सोलापूर) तालुक्यातील मार्डी श्रीक्षेत्र यमाईदेवी मंदिरात झालेली चोरी**

**(२०) ४९५८ (२५-०३-२०२०). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उत्तर सोलापूर (जि.सोलापूर) तालुक्यातील मार्डी श्रीक्षेत्र यमाईदेवी मंदिरात अज्ञात चोरांनी मोठी चोरी केल्याची घटना दिनांक २३ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मध्यरात्री घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेचा तपास करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, तपासानुसार सदर चोरांवर कोणता गुन्हा दाखल करण्यात आला आहे व त्यानुसार त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अनिल देशमुख (१६-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) श्रीक्षेत्र यमाई देवीच्या मंदिरातील देवीचे सोन्याचांदीचे दागिने व दानपेटीतील रक्कम असे एकूण १३,५२,०००/- रु. किंमतीचा मुद्देमाल चोरीस गेले प्रकरणी सोलापूर तालुका पोलीस स्टेशन येथे दि.२३/१२/२०१९ रोजी गु.र.नं. ८५९/२०१९ भा.दं.वि.सं. कलम ४५७, ३८० प्रमाणे अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी आरोपींचा शोध घेणेकामी घटनास्थळाची तपासणी करण्यासाठी श्वान पथक व अंगुली मुद्रा विभागाची मदत घेण्यात आली आहे. तसेच पोलीस ठाणेकडील तपास पथक तयार करण्यात आले आहेत. तसेच पोलीस ठाणे हद्दीतील सराईत व संशयित आरोपींकडे तपास करण्यात आला आहे. तसेच स्थनिक गुन्हे शाखा, सोलापुर ग्रामीण यांनी सदर आरोपीतांचा शोध घेण्याकामी एक पथक नियुक्त केले आहे.

सदर गुन्हेच्या तपासात दोन संशयित आरोपींना अटक करुन त्यांची पोलीस कस्टडी रिमांड घेऊन गुन्ह्याची उखल होण्याच्या अनुषंगाने सखोल तपास केला असता त्यांच्याकडून उपयुक्त माहिती मिळलेली नाही. जिल्हा हद्दीतील सर्व सराफ व्यावसायिकांना गुन्ह्यातील सोन्याचांदीचे दागिन्याची कोणी विक्री करणेकरीता आल्यास तात्काळ कळविण्याबाबत सर्व सराफ व्यावसायिकांना महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १२६ प्रमाणे नोटीस दिल्या आहेत.

---

**भांडूप (मुंबई) येथील टेंभीपाडा भागातील पोलीस चौकी नियमित सुरु ठेवण्याबाबत**

**(२१) ५३८७ (२५-०३-२०२०). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडूप (मुंबई) येथील टेंभीपाडा भागात पोलीस ठाण्यातील शेवटची चौकी असून शेजारी तुळशी तलावातुन पाणी पुरवठयासाठीची जुनी जलवाहिनी असल्याने त्यापलीकडे डोंगराळ भागात सद्य:स्थितीत गुन्हेगारीचे प्रमाण वाढले असुन याचा नाहक त्रास सामान्य नागरिकांना होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे

काय,

(२) असल्यास, सदरहू पोलीस चौकी दिवसातून काही वेळापूरतीच सुरु करण्यात येत असल्याने सदरहू पसिरात पोलीस विभागाचे धाक नसल्याने गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे हे लक्षात घेता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (११-०२-२०२१) :** (१) होय.

टेंभीपाडा भागात जानेवारी २०२० मध्ये गु.र.क्र.२७/२०२० नुसार गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्यातील आरोपींना लागलीच अटक करुन मा.न्यायालयासमोर हजर करण्यात आले आहे. या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे गुन्हे सदर भागामध्ये दाखल नाहीत.

(२) टेंभीपाडा बीट चौकीमध्ये दिवसरात्र नागरिकांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी एक पोलीस अधिकारी व एक अंमलदार तसेच बीट मार्शल व इतर मोबाईल यांची नेमणूक करण्यात येते.

तसेच नागरिकांना त्रास होऊ नये म्हणून गणवेषातील तसेच साध्या कपड्यातील पोलीसांच्या गस्तीचे आयोजन करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कळंब (जि यवतमाळ) येथील शेतकऱ्याची कामे होण्यास विलंब लागत असल्याबाबत**

**(२२) ५८७१ (२७-०३-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब (जि. यवतमाळ) परिसरातील शेतक-यांच्या जमीनी राष्ट्रीय महामार्गात आणि रेल्वे प्रकल्पात गेल्या असल्याने जमीनीची मोजणी करणे इ.कामे भुमी अभिलेख कार्यालय अंतर्गत येत असल्याने संबधित विभागाचे अधिकारी कार्यालयामध्ये हजर राहत नसल्याने शेतक-याची कामे होण्यास विलंब होत असल्याचे निवेदनावरून दिनांक ४ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमीन मोजनीची नोटीस देवून दोन ते तीन महिन्यांचा कालावधी होऊन सुध्दा विभागाचे कर्मचारी दखल घेत नाहीत म्हणुन शेतक-यांनी निवासी जिल्हाधिकारी यवतमाळ यांचेकडे विभागाच्या अधिका-यांची तक्रार केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतक-यांची शेती मोजणी इ.कामे होण्यामध्ये विभागाचे अधिकारी दुर्लक्ष करित असल्याचे आढळून आल्यास चौकशी करण्यात येवून त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (१८-०१-२०२१) :** (१) भूमी अभिलेख विभागाचे अधिकारी कार्यालयामध्ये हजर राहात नसल्याने शेतकऱ्यांची कामे होण्यास विलंब होत असल्याचे दिलेल्या निवेदनावरुन या आशयाचे वृत्त दि.०४.१२.२०१९ ते दिनांक ०६.१२.२०१९ दरम्यान काही वृत्तपत्रात प्रसिद्ध

झाले होते.

(२) हे खरे आहे.
(३) व (४) शेतकऱ्यांची शेती मोजणी इ.कामे होण्यामध्ये विभागाचे अधिकारी दुर्लक्ष करीत नाहीत. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बीड जिल्हयातील शेतकऱ्यांना पिक विमा देण्यासह फसवणुक केलेल्या बोगस सेंटरवर कारवाई करण्याबाबत**

**(२३) ६५५९ (०५-०४-२०२०). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्हयातील सुमारे २ लाख शेतकरी पिक विमा पासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिक विमा भरताना शेतक-यांनी खाजगी सेंटर मधून भरला असता त्यांना ऑनलाईन पावती दिली नसल्याचे समोर आले असुन बोगस सेंटरने शेतक-यांची फसवणूक करुन गायब झाले असल्याची माहिती माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय ,
(३) असल्यास, उक्त बोगस सेंटरची शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने पिक विमा भरताना शेतक-यांकडून पैसे उकळून त्यांना पावती दिली नसणा-या बोगस सेंटरवर कारवाई करुन बीड जिल्हयातील २ लाख शेतक-यांना पिक विम्याची रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०३-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. आयुक्तालयाचे पत्र क्र.७६३ दि.०२/१२/२०१९ अन्वये राज्य समन्वयक (C.S.C.E. Governance Service India Limited) यांना योजनेत सहभाग नोंदवताना जाणीवपूर्वक त्रुटीपूर्ण कागदपत्रे व माहिती अपलोड केलेली निदर्शनास आल्यास संबंधित व्हीएलइ/सीएससी नुकसान भरपाईचे दायित्वास जबाबदार राहतील. तसेच प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या अंमलबजावणीबाबत त्यांच्या स्तरावरुन सर्व जनसुविधा केंद्राना (CSC) पिक विमा योजनेतील सहभाग नोंदविताना करावयाच्या कार्यवाहीबाबत व सहभागी शेतकरी अर्जाचा तपशील जतन करणेबाबत निर्देश देणेबाबत कळविण्यात आले आहे.

खरीप हंगाम २०१९ मध्ये बीड जिल्हयात प्रधानमंत्री पिक विमा योजना भारतीय कृषि विमा कंपनी मार्फत राबविण्यात आली. बीड जिल्हयातील २०.९८ लाख शेतकरी अर्जदारांनी रक्कम रु.७१.८७ कोटी विमा हप्ता भरुन ७.३९ लाख हे. क्षेत्र विमा संरक्षित केले आहे. सहभागी शेतकरी अर्जदारांपैकी १३.७२ लाख शेतकऱ्यांना रक्कम रु.६३९.४१ कोटी नुकसान भरपाई विमा कंपनी मार्फत निश्चित करून पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात

आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आदिवासी विकास विभागाच्या योजनांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(२४) ६६९४ (२७-०३-२०२०). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाच्या योजनांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत राज्यभरातील १९ जिल्ह्यांतील २६ पोलीस ठाण्यांत दाखल असलेल्या १९१ तक्रारींपैकी तब्बल ११० तक्रारी प्रकरणी अद्‌याप एफआयआर दाखल करण्यात आला नसल्याची माहिती माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलिसांच्या या दिरंगाईबद्दल न्यायालयाने नाराजी व्यक्त केली असून तातडीने गुन्हे दाखल करण्याचे आदेश सहाय्यक पोलीस महानिरीक्षक यांनी संबंधीत पोलीस आयुक्त आणि पोलीस अधिक्षक कार्यालयांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदर प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत काय,

(४) असल्यास, विलंब करणा-या अधिका-यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (११-०२-२०२१) :**

(१) सदर प्रकरणी आतापर्यंत राज्यातील संबंधित पोलीस घटकांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार एकूण १२७ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. त्यापैकी ८० गुन्हे हे सन २०१८ व २०१९ मध्ये दाखल करण्यात आले असून, उर्वरित ४७ गुन्हे हे सन २०२० मध्ये दाखल करण्यात आले आहेत.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या अनुषंगाने तात्काळ चौकशी करुन गुन्हे दाखल करणे व याबाबत दिरंगाई होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत तसेच स्वत: लक्ष घालून कारवाई करण्याबाबतच्या सूचना संबंधित घटक प्रमुखांना दिनांक २३/०१/२०२० च्या ज्ञापनान्वये पोलीस महासंचालक कार्यालयाकडून निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

तद्‌नंतर संबंधीत घटक प्रमुखांकडून ३९ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे आदिवासी विकास विभागाकडे अद्‌यापही तक्रारी प्राप्त होत आहेत. त्यास अनुसरुन आवश्यक ती चौकशी करुन, त्याप्रमाणे सर्व प्रकरणांवर कायदेशीर गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चाळीसगांव (ता. जि. धुळे) येथे ए.ए,एन.आर.पी.एन.आर.सी कायद्याविरोधात केलेल्या आंदोलनाबाबत**

**(२५) ७३८१ (२७-०३-२०२०). श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगांव (ता. जि. धुळे) येथे चाळीसगांव रोडवर ए.ए,एन.आर.पी.एन.आर.सी कायद्या विरोधात नागरिकांनी उस्फूर्त बंद पुकारुन जोरदार घोषणाबाजी सुरु करुन पोलिसांच्या निदर्शनास येताच त्यांनी त्वरित संतप्त जमावाला पांगविले परंतु जमाव चाळीसगांव रोडने १०० फुटी रस्त्यापर्यंत झाल्याने व्यावसायिकांच्या हातगाडया तसेच टपऱ्यांची तोडफोड करण्यास सुरुवात केली व नंतर पोलिसांवरही दगडफेक करण्यास सुरुवात केली असता पोलिसांनी केलेल्या लाठीहल्ल्हयात पोलिसांसह अनेक नागरिक जखमी झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी या घटनेचा निषेध केला असून काही राजकीय हस्तक्षेपामुळे या बंदच्या घटनेला हिंसक वळण लागण्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तरी सदरहू बंदला हिंसक देणा-या समाजविघातक व्यक्तींची अटक करुन चौकशी करुन शासन त्यांच्यावर आवश्यक कारवाई करणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१६-०२-२०२१) :**

(१) व (२) होय, हे खरे आहे. सदर घटनेच्या अनुषंगाने चाळीसगांव रोड पोलीस ठाणे येथे गु.रं.नं. ०९/२०२० भा.दं.वि. कलम ३०७, १४३, १४७, १४९, ३३६, ३३७, ३३८, ३३२, ३३३, ४२७, १८८, ११४, ४३५, ३४१, ५०४, ५०६, सार्वजनिक मालमत्ता विद्रुपिकरण कलम ३, ४ तसेच क्रिमीनल लॉ अमेंटमेंट ॲक्ट कलम ७ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१)(३) चे उल्लंघन १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला असून सदर गुन्ह्यामध्ये एकूण ४५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**वर्धा येथे राष्ट्रसेविका समितीच्या विदर्भ प्रांत पथसंचालनासाठी पोलीस बंदोबस्त न पुरविल्याबाबत**

**(२६) ७४०७ (२०-०४-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसेविका समितीचे विदर्भ प्रांत पथसंचालन वर्धा शहरात माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान आयोजित करण्यात आले असून या पथसंचालनात विदर्भातील सुमारे ३६०० पेक्षा अधिक सेविका सहभागी झाल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पथ संचालनासाठी पोलीसांकडे रीतसर परवानगी अर्ज सादर करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भव्य मोर्चाचे दरम्यान जिल्हा पोलीस प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारचा पोलीस बंदोबस्त पुरविण्यात आला नव्हता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मोर्चाच्या दरम्यान वाहतुकीचे नियमन करण्यासाठीही कोणत्याही प्रकारची वाहतुक पोलीसांची यंत्रणा कार्यरत नव्हती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अशा प्रकारे मोर्चादरम्यान पोलीस बंदोबस्त न पुरविल्यामुळे भरधाव वाहतुकीपासून मोर्चाचे संरक्षण करण्यामध्ये धोका निर्माण झाला होता, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, मोर्चाला पोलीस बंदोबस्त न पुरविण्याऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१६-०२-२०२१) :** (१) दिनांक ०२.०२.२०२० रोजी राष्ट्रसेविका समितीचे विदर्भ प्राप्त पथसंचालनात सुमारे ५५० ते ६०० सेविका सहभागी झाल्या होत्या.

(२) होय.

(३) सदर मोर्चासाठी पोलीस बंदोबस्त पुरविण्यात आला होता.

(४) सदर मोर्चाच्या दरम्यान वाहतुकीचे नियमन करण्यासाठी उपाययोजना केली होती.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हवेली (जि.पुणे) तहसीलदार यांच्याकडून महाराष्ट्र नागरी सेवा नियमामधील तरतुदींचा भंग झाल्याबाबत

**(२७) ११३०८ (१२-०९-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली (जि.पुणे) तहसीलदार यांच्याकडून महाराष्ट्र नागरी सेवा नियमामधील तरतुदींचा भंग झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमीन महसूल व गौण खनिजाच्या वसुलीचे उद्दिष्ट, नियोजन, तहसील कार्यालयातील ई हक्क प्रणालीचे अर्ज प्रलंबित असणे, नियमितपणे कार्यालयात न येणे, नागरिकांना हीन दर्जाची वागणूक देणे, लोकप्रतिनिधीचे फोन त्वरित न घेणे, अनेक आवश्यक निर्णय प्रलंबित असणे, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गावांमध्ये भेटी न देणे इत्यादी गैरप्रकार तहसीलदार हवेली यांच्याकडून झाल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या प्रकरणी संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२२-०१-२०२१) :** (१), (२), (३) व (४) जिल्हाधिकारी, पुणे यांच्या सुचनेनुसार तहसीलदार हवेली यांच्या कार्यालयाची तपासणी उपविभागीय अधिकारी, हवेली यांनी केली होती. त्याअनुषंगाने प्रलंबित प्रकरणे व कामकाज पुर्ण करण्याबाबत उपविभागीय अधिकारी हवेली यांच्यामार्फत तहसीलदार हवेली यांना कळविण्यात आले होते. तहसील कार्यालयात उपस्थित राहून नागरिकांच्या तक्रारीचे निराकरण करावे व त्यांच्या प्रलंबित कामाचा निपटारा करावा तसेच लोकप्रतिनिधीबरोबर सौजन्यपुर्वक वागणूक ठेवावी व राजशिष्टाचाराचे पालन करावे याबाबत उपविभागीय अधिकारी यांच्याकडून तहसीलदार हवेली यांना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खडकवासला (ता. हवेली, जि. पुणे) अंतर्गत डोणजे, सिंहगड रस्ता, पानशेत रस्त्यावर हुक्का पार्लरसह विविध अवैध धंद्यांमध्ये वाढ झाल्याबाबत**

**(२८) ११३५१ (१२-०९-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला (ता. हवेली, जि. पुणे) अंतर्गत डोणजे, सिंहगड रस्ता, पानशेत रस्त्यावर हुक्का पार्लरसह विविध अवैध धंद्यांमध्ये वाढ झाली असून हुक्का पार्लरमध्ये अल्पवयीन मुलांना प्रवेश देऊन तंबाखू सारख्या अंमली पदार्थांचा पुरवठा होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे शहरातील कोरेगाव पार्क, मुंढवा, कोंढवा या भागातील हॉटेलमध्ये बेकायदा हुक्का पार्लर सुरु असून उक्त ठिकाणी हुक्का पार्लरसह अंमली पदार्थांचा पुरवठा होत असल्याचे निदर्शनास येत असतांनाही त्या विरोधात प्रशासनाने अद्यापपर्यंत कुठलीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१२-०२-२०२१) :** (१) प्रश्नाधीन भागात माहे जानेवारी, २०२० ते माहे जुलै, २०२० या कालावधीत केलेल्या कारवाई दरम्यान हुक्का पार्लरमध्ये अल्पवयीन मुलांना प्रवेश देऊन तंबाखु सारख्या अंमली पदार्थांचा पुरवठा होत असल्याचे आढळुन आलेले नाही.

वरील कालावधीदरम्यान इतर अवैध धंद्यासंदर्भात प्राप्त तक्रारीनुसार वेळोवेळी केलेल्या कारवाईमध्ये दारुबंदी कायदयाचे उल्लंघन प्रकरणी १४ गुन्हे व जुगार कायद्याअंतर्गत २ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.
(२) पुणे शहरातील कोरेगाव पार्क, मुंढवा, कोंढवा या भागातील हॉटेलमध्ये अधिकृत हुक्का पार्लर सुरु नाहीत.

सन २०१९-२० मध्ये फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार कोटपा अधिनियम, २००३ व कोटपा (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०१८ मधील तरतुदीनुसार अनाधिकृतरित्या सुरु असलेल्या हुक्का पार्लरवर कारवाई करण्यात आली आहे.

| दाखल गुन्हे | अटक आरोपी | जप्त मुद्देमाल किंमत |
|---|---|---|
| ३३ | ८३ | रुपये ५,९१,७००/- |

हॉटेल-चालक मालक अनाधिकृतपणे हुक्का पार्लरसह अंमली पदार्थांचा पुरवठा करत असल्याचे आढळून आल्यास त्यांचेविरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याची तजवीज ठेवली आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात लॉकडाऊनच्या काळात पोलिसांवर मोठ्या प्रमाणात हल्ले झाल्याबाबत**

**(२९) ११४८० (१३-०९-२०२०). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती मुक्ता टिळक (कसबापेठ), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.वैभव नाईक (कुडाळ), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लॉकडाऊनच्या कालावधीत कोरोना विषाणू संक्रमानास प्रतिबंध घालण्यासाठी काम करत असलेल्या डॉक्टर, नर्स, अंगणवाडी सेविका, मदतनीस इत्यादी तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी दिवस-रात्र बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांशी हुज्जत घालणे, मारहाण करणे, इत्यादी घटना दिवसेंदिवस वाढत असून पोलिसांवरील हल्ल्यांच्या २०० पेक्षा अधिक प्रकरणांची नोंद करण्यात आली असून ८१२ जणांना अटक करण्यात आली आहे तसेच याबाबतच्या दररोज सरासरी तीनपेक्षा अधिक घटना घडत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील मरिन ड्राईव्ह येथे पोलीस निरीक्षक श्री.जितेंद्र कदम व पोलीस उप निरीक्षक श्री.शेळके यांच्यावर श्री.करुण नायक नामक व्यक्तीने कोयत्याने हल्ला केल्याची घटना दिनांक ९ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास घडली असून लॉकडाऊन सुरू झाल्यापासून जमावबंदी आदेश मोडणे,अवैध वाहतूक आणि पोलिसांना मारहाण प्रकरणी एकूण घडलेल्या घटनांमधील गुन्हेगारांविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, कोरोना विषाणू संक्रमण रोखण्यासाठी काम करणाऱ्या डॉक्टर, नर्स, अंगणवाडी सेविका, मदतनीस तसेच कायदा व सुव्यवस्था राखणाऱ्या पोलिसांवरील हल्ले रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत तसेच याबाबत कायदा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय, असल्यास त्याचे स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१६-०२-२०२१) :** (१) राज्यात लॉकडाऊनच्या काळामध्ये मार्च ते नोव्हेंबर, २०२० दरम्यान पोलीसांवर झालेल्या मारहाणीच्या अनुषंगाने ३४१ प्रकरणांची नोंद करण्यात आली असून समाजकटकांवर तद्नुषंगिक कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.
(२) सदर प्रकरणी लोकमान्य टिळक मार्ग पोलीस ठाणे येथे गु.नो.क्र.२८२/२०२०, कलम १८८, २६९, ३०७, ३२४, ३३२, ३५३ भादं.वि. सह कलम ४, २७ शस्त्र अधिनियम सह महाराष्ट्र कोवीड-१९ उपाययोजनांचे कलम ११ अन्वये दाखल करण्यात आला असून आरोपीला अटक केली आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

बृहन्मुंबई पोली स आयुक्तालय कार्यक्षेत्रात लॉकडाऊन सुरु झाल्यापासून जमावबंदी आदेश मोडणे प्रकरणी २२२१५ गुन्हे, पोलीसांवरील हल्ल्याबाबत ६१ गुन्हे व अवैध वाहतुकबाबत २९२४ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहे.
(३) लॉकडाऊनच्या काळात कर्तव्यांवर असलेल्या कर्मचाऱ्यांना/पोलीसांना मारहाण करणाऱ्या समाजकंटकांवर तात्काळ गुन्हे दाखल करुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच भा.दं.वि. कलम ३३२, ३५३ सह इतर आवश्यक कलमांनुसार अजामिनपात्र गुन्हे दाखल करण्यात आले असून संबंधीत आरोपितांना अटक करण्यात आली आहे.

पोलीसांवरील हल्ल्यासंदर्भात पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाने दिनांक ०६.१०.२०२० अन्वये सूचना निर्गमित करण्यात आलेल्या असून अशा घटनांमध्ये तात्काळ गुन्हा दाखल करुन चौकशीअंती सबळ पुराव्यानिशी गुन्ह्याचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्याच्या सूचना राज्यातील सर्व घटक प्रमुखांना देण्यात आल्या आहेत. तसेच अशा घटनांना प्रतिबंध करण्यासाठी तात्काळ कठोर कारवाई करणेबाबत सूचित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे तालुक्यातील फागणे, मुकटी, शिरूड आणि नेर या गावांमध्ये नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत

**(३०) ११६८७ (१३-०९-२०२०). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे तालुक्यातील शिरूड, मुकटी, फागणे आणि नेर ही गावे जास्त लोकसंख्येची असून या गावांशी परिसरातील अनेक गावांचा रोजचा संपर्क येत असल्याने या गावासह परिसरातील वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी तसेच कायदा व सुव्यवस्था ठेवण्यासाठी स्वतंत्र पोलीस ठाण्यास मंजुरी देवून ते तातडीने उभारण्यात यावे अशी मागणी स्थानिक रहिवाशांकडून करण्यात आल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणी लक्षात घेता शिरूड, मुकटी,फागणे आणि नेर या तिन्ही गावांमध्ये नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (२७-०१-२०२१) :** (१) व (२) धुळे तालुका पोलीस ठाण्यामधून शिरूड हे नवीन पोलीस ठाणे निर्माण करणेबाबत स्थानिकांकडून मागणी होत आहे. तथापि शिरूड,मुकटी,फागणे व नेर ही गावे लहान असून तेथे गुन्हयांचे प्रमाण कमी आहे. मुकटी,फागणे व नेर ही गावे धुळे तालुका पोलीस स्टेशन अंतर्गत समाविष्ट असल्याने येथे पोलस स्टेशन निर्माण करणे प्रस्तावित नाही.

कुसुंबा, शिरूड व मोगलाई ही तीन नवीन पोलीस ठाणे निर्माण करणेबाबत पोलीस अधीक्षक,धुळे यांनी सादर केलेल्या प्रस्तावाचा महाराष्ट्र राज्य पोलीस दलाच्या सुधारित आकृतीबंधात समावेश करण्यात आला आहे.

सद्यस्थितीत पोलीस महासंचालक कार्यालयाने सादर केलेला महाराष्ट्र राज्य पोलीस दलाचा सुधारित आकृतीबंध वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वारंगा फाटा (जि. हिंगोली) येथील जमीनीच्या मोजणी अहवाल व नकाशाबाबत**

**(३१) ११७२५ (१३-०९-२०२०). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वारंगा फाटा (जि. हिंगोली) येथील शेत सर्वे नं.१०४/२ मधील जमीन कालवा व बोगदा कामासाठी सन १९८० मध्ये संपादित करण्यात आली असून त्या जमिनीचा संयुक्त अहवाल, नकाशा बनावट तयार करून संगनमताने राष्ट्रीय महामार्गालगतची जमीन व शासकीय मोबदला हडप करण्याचा प्रयत्न जमीन मालक करीत असल्यामुळे दिनांक १६ मार्च, २०२० रोजी झालेल्या सुनावनीत अप्पर जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी कळमनूरी उपअधिक्षक भूमिअभिलेख यांना उक्त जमिनीच्या क्षेत्राची संयुक्त मोजणी करून मोजणी अहवाल व नकाशा तात्काळ सादर करण्याच्या सुचना दिल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित उपअधिक्षक भूमिअभिलेख यांनी वेळेवर मोजणी अहवाल व नकाशा सादर केला नसून वारंवार सुचना व नोटिस बजावूनही अद्यापपर्यंत त्यांनी मोजणी अहवाल व नकाशा सादर केलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यापूर्वीही उपअधिक्षक भूमिअभिलेख यांनी राष्ट्रीय महामार्गाच्या कामात निष्कळजीपणा व दिरंगाई केल्याबाबतची तक्रार उपविभागीय अधिकारी यांनी जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्व प्रकरणी तातडीने चौकशी करून दोषी असलेल्या अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२०-०१-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
(३) होय.
(४) जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्या दि.१६.०७.२०२० च्या आदेशान्वये श्री. एस. व्ही. मुंढे, उप अधीक्षक भूमि अभिलेख, हिंगोली यांना निलंबित करण्यात आले आहे. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दि.१०.१२.२०२० च्या ज्ञापनान्वये श्री. एस. व्ही. मुंढे, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, हिंगोली यांचेविरुध्द म. ना. से. (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८ अन्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. तसेच, श्री.सुजित जाधोर, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, हिंगोली यांचेविरुध्द दि.१०.१२.२०२० च्या ज्ञापनान्वये म. ना. से. (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम १० अन्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

---

**कोपरगांव (जि. अहमदनगर) येथील दुय्यम कारागृहाच्या इमारतीची दुरावस्था झाल्याबाबत**

**(३२) ११७६९ (१३-०९-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोपरगांव (जि.अहमदनगर) येथील तहसिल कार्यालयातील दुय्यम कारागृहाची दुरवस्था झाली असून त्याची तातडीने दुरुस्ती करावी अशी मागणी तहसिलदार, कोपरगांव यांनी माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना पत्र पाठवून केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नव्याने बांधलेल्या तहसिल कार्यालयात जुने दुय्यम कारागृह असून या कारागृहात एकूण ५ बराकी असून एका बराकित चार कैदी या प्रमाणे केवळ २० कैदी ठेवता येतात तथापी येथे सद्य:स्थितीला ६१ कैदी ठेवण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कारागृहातून गंभीर गुन्ह्यातील अरोपींनी कारागृह फोडून पळून जाण्याचा प्रयत्न केला असून आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार सदर कारागृहाची पुनर्बांधणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१५-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

कोपरगांव, जि. अहमदनगर येथील दुय्यम कारागृहातून सन २०१४ मध्ये ७ कैदी पळून गेले होते. तसेच सन २०१८ मध्ये १७ कैद्यांनी या कारागृहातून पळून जाण्याचा प्रयत्न केला होता. सदर कैद्यांवर कोपरगांव शहर पोलीस स्टेशन, कोपरगांव येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आरोपींविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून, सदर गुन्हे न्यायप्रविष्ठ आहेत.

(४) कोपरगांव, जि. अहमदनगर येथे दुय्यम कारागृह पुनर्बांधणीसाठी जागा उपलब्ध नाही. तथापि, सदरील दुय्यम कारागृहाच्या दुरुस्तीचे कामकाज सुरु करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धनगर टाकळी (ता.पुर्णा, जि.परभणी) येथे झालेल्या चोरीबाबत**

**(३३) ११८१९ (१३-०९-२०२०). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धनगर टाकळी (ता.पुर्णा, जि.परभणी) येथे दिनांक २ मे, २०२० रोजी वा त्या सुमारास मध्यरात्री चोरांनी सोन्या - चांदीच्या दागिन्यांसह रोख रक्कम असा लाखो रूपयांचा ऐवज चोरी केल्याचा गुन्हा श्री. भिमराव उकंडे यांनी चुडावा पोलीस ठाणे येथे माहे मे, २०२० मध्ये वा त्या दरम्यान दाखल केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीसांनी श्वान पथक, बोटाचे ठसे इत्यादी प्रकारे तपास करूनही सदर गुन्ह्याचा तपास लावता आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गुन्ह्याचा तपास तात्काळ करून दोषींवर कारवाई व चोरीस गेलेला ऐवज संबंधितांस परत मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१६-०२-२०२१) : (**१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४)

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, चुडवा, जि. परभणी येथे गु.र.नं.७९/२०२० भा. दं. वि. कलम ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी आरोपीचा शोध घेण्याचा कसोशीने प्रयत्न करण्यात आला असून आरोपी मिळून न आल्याने गुन्हा कायम तपासावर ठेवून मा. न्यायालयात 'अ' वर्ग समरी सादर करण्यात येत आहे.

(५) विलंब झालेला नाही.

---

**टाळेबंदीच्या काळात मराठवाड्यात हत्याकांडाच्या घटना घडल्याबाबत**

**(३४) ११८६८ (१३-०९-२०२०). श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील टाळेबंदीच्या काळात नांदेड,लातूर व बीड या जिल्हयात हत्याकांडाच्या घटना घडत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यात गुंड प्रवृत्ती लोकांवर तेथील पोलीस प्रशासनाचा वचक राहीलेला नसून उक्त तिन्ही जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,अशा हत्याकांडाच्या घटना रोखण्याबाबत तसेच दोषी आरोपींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (०१-०२-२०२१):** (१) टाळेबंदीच्या काळात नांदेड व बीड जिल्हयात हत्याकांडाच्या प्रत्येकी २ अशा एकूण ४ घटना घडल्या असून लातूर जिल्हयात या कालावधीत एकही हत्याकांडाची घटना घडलेली नाही.

(२) व (३) टाळेबंदीच्या काळात नांदेड जिल्हयात दोन हत्याकांड घडले प्रकरणी उमरी, पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.११७/२०२० व गु.र.नं.११८/२०२० असे दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच बीड जिल्हयात दोन हत्याकांड घडले प्रकरणी युसूफ वडगांव, पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१०६/२०२० व पेठ बीड, पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१५०/२०२० असे दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. उपरोक्त गुन्हयात आरोपींना अटक करुन आरोपीविरुद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

उक्त चारही गुन्हयात तात्काळ कारवाई करण्यात आल्याने गुंड प्रवृत्तीच्या लोकांवर पोलीस प्रशासनाचा वचक राहिलेला नाही, हे म्हणणे खरे नाही.

असे गुन्हे घडू नयेत म्हणून परिणामकारक गस्त, प्रतिबंधत्मक कारवाई, रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर पाळत ठेवणे तसेच गुन्हेगारांकडून बंधपत्र घेणे अशा प्रकारची प्रतिबंधात्मक कारवाई केली जात आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**मुंबईत आंतरराष्ट्रीयदर्जाचे क्रिकेट स्टेडिअम उभारण्याबाबत**

**(३५) १२४८१ (१४-०९-२०२०). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जोगेश्वरी-विक्रोळी जोड रस्त्यालगतच्या शहीद विजय साळसकर उद्यानाजवळील आरेच्या हद्दीतील मोकळया जागेवर राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तराचे क्रिकेट स्टेडियम उभारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास

मा. क्रीडा व युवक कल्याण मंत्री व दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री व पालकमंत्री, मुंबई उपनगर यांना निवेदन सादर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू स्टेडियमच्या उभारणीसाठी शासन एकूण किती निधी उपलब्ध करून देणार असुन कामास प्रत्यक्षात केव्हापासून सुरूवात करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने सदरहू मोकळया जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (०२-०२-२०२१) :** (१) याबाबतचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) व (३) सदर जागा आरे ( हरित पट्टयातील ) वनक्षेत्राची आरक्षित जागा आहे. आरक्षणात बदल होऊन सदर जागा क्रीडा विभागाकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय झाल्यास, तेथे क्रीडा सुविधा विकसित करता येतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई-गोवा महामार्गासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्यासाठी लाच मागण्यात येत असल्याबाबत

**(३६) १२६८६ (१३-०९-२०२०). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्यासाठी शेतकऱ्यांकडून एका बँकेच्या कर्मचाऱ्यामार्फत कुडाळ प्रांताधिकारी ५ लाख रुपयांची मागणी केली जात असल्याचा प्रकार एका प्रकल्पग्रस्त जमीनदार व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आणला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करून याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास पालकमंत्री, सिंधुदुर्ग, जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांच्याकडे केली आहे , हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, सदर प्रकरणी अद्याप संबंधित दोषी अधिकारी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी निवेदनाच्या अनुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२२-०१-२०२१) :**(१) होय, हे खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३० जून २०२० रोजी जिल्हाधिकारी,सिंधुदुर्ग कार्यालयाकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रार दाखल केली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३० जून २०२० रोजी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग कार्यालयाकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रार दाखल करून ,भ्रष्ट अधिकाऱ्यांची रीतसर चौकशी करून कारवाई करण्याबाबत विनंती केलेली आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग कार्यालयाकडून चौकशी समिती गठीत करून चौकशी करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकरणी श्रीम.खरमाळे,उपविभागीय अधिकारी, कुडाळ यांचेविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल),नियम १९७९ अन्वये विभागीय चौकशी प्रस्तावित करण्याबाबत विभागीय आयुक्त,कोकण विभाग,नवी मुंबई यांचे कार्यालयाकडे जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग कार्यालयाकडून जोडपत्र १ ते ४ दोषारोपासहीत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणी विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन , नवी मुंबई यांचे कार्यालयाकडून कारवाई चालू आहे.

(५) अशी बाब नाही.

---

**कोळगाव (ता.अलिबाग, जि.रायगड) मधील मांडवा जेट्टी जवळील**
**बेकायदा बांधकामावर कारवाई करण्याबाबत**

**(३७) १२९२७ (१३-०९-२०२०). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोळगाव (ता.अलिबाग, जि.रायगड) मधील मांडवा जेट्टी जवळील जमिनीवर व्यवसायिक अशोक मित्तल यांनी बेकायदा अतिरिक्त बांधकाम करून उभारलेल्या बंगल्यावर कारवाई करण्याचे आदेश दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने जिल्हाधिकारी, रायगड यांना दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिरिक्त बेकायदा बांधकाम हे मालकाने तीन महिन्यात स्वतः तोडावे आणि त्यांनी तसे केले नाही तर जिल्हाधिकाऱ्यांनी कारवाई करावी तसेच अर्धवट स्वरूपात बांधकाम तोडणे शक्य नसल्यास संपूर्ण बांधकाम तोडावे आणि त्यानंतर मालकांना पूर्वीच्या परवानगीप्रमाणे बांधकाम पूर्ण करण्याची मुभा राहील तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी दिनांक २० मार्च, २०१९ पर्यंत कारवाईचा अहवाल द्यावा असे न्यायमूर्ती अभय ओक यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या आदेशात स्पष्ट केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ रोजीचे मुंबई उच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश असतानाही रायगड जिल्हाधिकाऱ्यांमार्फत अद्याप कारवाई पूर्ण करण्यात आली नसून या बेकायदा बांधकामावर कारवाई करण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच सदरहू बांधकामावर कारवाई न करणाऱ्या संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करत आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (०३-०२-२०२१) :**

(१), (२) व (३) होय, हे खरे आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे दिनांक ०१.११.२०१८ च्या आदेशाप्रमाणे अनाधिकृत बांधकाम निष्कासित करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली होती. तथापि, सदर प्रकरणी मा. न्यायालयामध्ये दिनांक १२.३.२०२० रोजी झालेल्या सुनावणीमध्ये अनाधिकृत बांधकाम दिनांक ०७.४.२०२० पर्यंत निष्काषित करणेबाबत मुदत देण्यात आली होती. त्यानुषंगाने अनाधिकृत बांधकाम निष्काषित करण्याची कार्यवाही सुरु होती, श्री. मित्तल यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका क्र. ०२/२०२० दाखल केली असता मा. उच्च न्यायालयाने कोरोना साथरोगाच्या पार्श्वभूमीवर दिनांक ३१.१०.२०२० पर्यंत बांधकाम निष्कासित करण्यास स्थगिती दिली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मच्छिमारांना कर्जमाफीसह आर्थिक सहाय्य देण्याबाबत**

**(३८) १३३०३ (१७-०७-२०२०). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्हयांच्या विकासाबाबत मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक १८ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधदुर्ग येथे बैठक घेतली असता उक्त बैठकीत शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या कर्जमाफीच्या धर्तीवर मच्छिमारांना कर्जमाफी देण्याबाबत शासन विचाराधीन असून यासाठी मच्छिमारांचे सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्याची सूचना मा. मुख्यमंत्री यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मच्छिमारांच्या प्रश्नांचा अभ्यास आणि मत्स्यदुष्काळाचे निकष ठरविण्यासाठी समिती नेमण्याची घोषणा मत्स्यव्यवसाय मंत्री यांनी दिनांक २७ फेब्रुवारी २०२० रोजी वा त्यासुमारास केली असुन उक्त समिती चार महिन्यात शासनाला अहवाल सादर करुन त्यातील शिफारशींच्या अनुषंगाने मच्छिमारांना आर्थिक सहाय्य करण्यात येईल असे मा.मत्स्यव्यवसाय मंत्री यांनी जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने मच्छिमारांचे सर्वेक्षण करुन उक्त अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,त्यात कोणत्या शिफारशी करण्यात आल्या आहेत आणि त्यानुसार मच्छिमारांना कर्जमाफीसह आर्थिक सहाय्य देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख (१०-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) मा.मंत्री (मत्स्यव्यवसाय) यांनी विधानमंडळात केलेल्या घोषोच्या अनुषंगाने मत्स्यदुष्काळाच्या संदर्भात प्रधान सचिव (पदुम) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०९.१२.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठित करण्यात आली आहे.

(३) सन २०१९-२० या वर्षाच्या हंगामामध्ये राज्यातील मच्छिमारांना पूर्ण क्षमतेने मासेमारी करता न आल्याने शासन पत्र क्र.मत्स्यवि-११२०/प्र.क्र.९२/पदुम-१४,दि.१२.०६.२०२० अन्वये

विविध सवलती देण्यात आलेल्या आहेत.

तसेच क्यार चक्रीवादळामुळे कोकण किनारपट्टीवरील मच्छीमारांना मासेमारी न करता आल्यामुळे झालेल्या नुकसानीबद्दल रु.६५,१७,२०,०००/- इतके विशेष सानुग्रह अनुदान अदा करण्यास शासन निर्णय दि.०९.०९.२०२० अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली असून रु.३२.५८५ कोटी इतका निधी वितरीत केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कासा (जि.पालघर) येथील परिसरात अतिक्रमण व बांधकाम झाल्याबाबत**

**(३९) १३४८७ (१३-०९-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील कासा परिसरात तसेच राष्ट्रीय महामार्गालगत अनेक आदिवासीच्या जमिनीवर अतिक्रमण व बांधकाम झाल्याची बाब दिनांक १ जुलै, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार या जागांवरील अतिक्रमण तातडीने दूर करून जागेचा ताबा आदिवासी बांधवांना मिळवून देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बाळासाहेब थोरात (०४-०२-२०२१) :** (१), (२) व (३) श्रीम.काशी गणपत गोवारी व इतर आदिवासी खातेदारांनी त्यांचे मालकीचे मौजे कासा, ता.डहाणू, जि.पालघर येथील स.नं.४९ मध्ये श्री.हरेश शिवराम मुकणे यांनी अनधिकृतपणे कुंपणाचे बांधकाम केले असल्याबाबत दिनांक २४.०६.२०२० च्या पत्रान्वये तहसिलदार, डहाणू यांचेकडे तक्रार दाखल केली आहे. प्रस्तुत प्रकरणी मा.दिवाणी न्यायालय, डहाणू येथे कब्जा व निरंतर मनाई आदेशाच्या अनुषंगाने रे.मु.नं.३०/२०१८ दाखल असून कोर्ट कमिशन नेमून दिनांक ०३.०८.२०२० रोजी उप अधिक्षक, भूमी अभिलेख, डहाणू यांचेमार्फत जमिनीची मोजणी करण्यात आली आहे. सदर मोजणीचा अहवाल मा.दिवाणी न्यायालयात सादर करण्यात आला आहे. मा.दिवाणी न्यायालय, डहाणू यांचे आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भुसावळ (जि.जळगाव) शहरात करण्यात आलेल्या गोळीबाराबाबत**

**(४०) १३७७१ (१३-०९-२०२०). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगाव) शहरात सुमारे १५ लाखांच्या घरफोडी प्रकरणातील दोन संशयीत आरोपींना अटक करण्यासाठी गेलेल्या पोलीस पथकामध्ये व आरोपींमध्ये सुन्नी मशीदजवळ झटापट होवून गोळीबार झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या प्रकरणातील किती आरोपींना अटक करण्यात आली आहे व त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अनिल देशमुख (०३-०२-२०२१) :** (१) भुसावळ बाजारपेठ, पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ५८८/२०२० भा.दं.वि.स.कलम ४५४, ४५७, ३८० या गुन्ह्यात फरारी आरोपी हे भुसावळ शहरात जाम मोहल्ला भागात फिरत असल्याची गुप्त बातमी मिळाल्याने दि.२१/०६/२०२० रोजी त्यांना पकडण्यासाठी पोलीस पथक गेले. दोन्ही आरोपींची अंगझडती घेतली असता एका आरोपीच्या कमरेत चाकू मिळून आला तर दुस-या आरोपीची झडती घेत असताना पोलीस व आरोपी यांच्यात झटापट होऊन आरोपीच्या कमरेतुन एक गावठी पिस्तुल जमिनीवर पडल्याने त्यातून एक राऊंड फायर झालेला आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी भुसावळ बाजारपेठ, पोलीस स्टेशन येथे भाग-६ सीसीटीएनएस गु.र.नं. ६६६/२०२० आर्म अक्ट कलम ३/२५, ३/२७ प्रमाणे दोन आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांना प्रथम पोलीस कस्टडी घेण्यात आली असून सध्या आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.
(४) विलंब झालेला नाही.

---

### हिंगोली वाहतूक शाखेतील सहाय्यक पोलीस निरीक्षक यांना निलंबित करण्याबाबत

**(४१) १४३३६ (१३-०९-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यात वाहतूक शाखेत कार्यरत असलेल्या सहाय्यक पोलीस निरीक्षक यांनी संचारबंदी कालावधीत शेतकरी, व्यापारी, पत्रकार आणि सामान्य जनतेच्या गाड्या अडवून नाहक त्रास दिल्याच्या निषेधार्थ अनेक तक्रारी दाखल असून त्या विरोधात आंदोलने देखील झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाहतूक पोलिसांकडून दिनांक २९ मार्च, २०२० रोजी वा त्या सुमारास संचारबंदी शिथिल असलेल्या वेळेतही जनतेला विनाकारण मारहाण होत असलेल्या घटनेचे वार्तांकन करण्यासाठी गेलेले न्यूज १८ आयबीएन लोकमतचे पत्रकार कन्हैया खंडेलवाल यांना वाहतूक शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक यांनी व त्यांच्या पथकाने विनाकारण मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सहाय्यक पोलीस निरीक्षक यांनी यापूर्वी कार्यरत असलेल्या वर्धा येथे पत्रकार व राजकीय पक्षांचे पदाधिकारी यांना मारहाण करणे, नांदेड येथे स्थानिक गुन्हे शाखेत असताना खंडणीच्या गुन्ह्यांमध्ये आरोपीने त्यांचे नाव घेणे तसेच आखाडा बाळापुर (जि. हिंगोली) येथे व्यापारी लोकप्रतिनिधी यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून धमक्या देणे इत्यादी प्रकार केल्याबाबत तक्रारी दाखल आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी हिंगोली पोलीस विभागातील वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक यांची चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, त्यानुसार तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी, शेतकरी, व्यापारी यांनी संबंधित सहाय्यक पोलीस निरीक्षक यांना निलंबित करण्यासंदर्भात केलेल्या अनेक तक्रारी व निवेदनावर शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (०३-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

तथापि, स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १३/०६/२०२० रोजी जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक, हिंगोली यांना संचारबंदीच्या काळात पोलीसांकडून वाहनधारकांवर कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नये, असे निवेदन दिले आहे.
(२) असे निदर्शनास आले नाही. श्री. कन्हैयालाल खंडेलवाल यांनी दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या चौकशीत दि. २९.०३.२०२० वा त्यासुमारास संचारबंदी शिथिल असलेल्या वेळेत श्री. खंडेलवाल यांना वाहतूक शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक श्री. ओमकांत आनंदराव चिचोंळकर यांनी व त्यांच्या पथकाने मारहाण करुन कानपटिस बंदूक लावुन जिवे मारण्याची धमकी दिल्याचे निष्पन्न झाले नाही.

तथापि, सदर प्रकरणात पत्रकार श्री. खंडेलवाल व त्यांचे सहकारी यांनी वाहतुक शाखेचे स.पो.नि. चिचोंळकर व कर्मचारी यांना मारहाण केल्याने पोलीस स्टेशन हिंगोली शहर येथे गु. र. क्र. १६१/२०२० कलम ३५३, ३३३, ३३२, २७०, १८६, १८८, १८९, २९४, १४३, १४७, १४९ भा. दं. वि., आपत्तीव्यवस्थापन कायदा कलम ५६, व कलम १३५ म. पो. का. प्रमाणे गुन्हा दाखल असून सदरचा गुन्हा तपासावर आहे.
(३), (४) व (५) श्री. चिंचोळकर, हे पोलीस स्टेशन आ. बाळापुर येथे कार्यरत असताना दि. १३/१०/२०१८ रोजी अवैध जुगार खेळणाऱ्या इसमांवर छापा मारुन गु.र.नं. ३३०/१८ कलम १२ (अ) प्रमाणे ८ आरोपींताविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर आखाडा बाळापुर येथील नागरीक व व्यापारी यांनी दिनांक १४/१०/२०२० रोजी रास्ता रोको आंदोलन करुन स.पो.नि. चिचोंळकर यांची तात्काळ बदली करावी, अन्यथा आ. बाळापुर व परीसरात दुर्गादेवी मंडळाचे विसर्जन करणार नाही, अशा मागणीचे निवेदन दिले होते.

श्री. चिचोंळकर हे सहायक पोलीस निरीक्षक म्हणून पोलीस स्टेशन गिरड, जि. वर्धा येथे कार्यरत असतांना मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन केलेल्या लोकांवर कारवाई करताना अश्लिल भाषेत शिविगाळ करुन मारहाण केल्याच्या व लोकांशी अरेरावीचे वर्तन केल्याच्या कसुरीच्या अनुषंगाने श्री. चिचोळकर यांना अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), यांनी अपीलावर रू. ३०००/- तसेच श्री. चिंचोळकर, हे वाहतुक नियंत्रण शाखा, वर्धा येथे नेमणुकीस असतांना केलेल्या कसुरीबाबत पोलीस अधीक्षक, वर्धा यांनी रू. २०००/- दंडाची शिक्षा केली आहे.

पोलीस स्टेशन वजिराबाद नांदेड येथे दाखल गु. र. नं. ४१६/२०१७ मध्ये फिर्यादी यांनी श्री.चिचोंळकर यांच्या नावाचा उल्लेख केला होता. परंतु, सदर गुन्हयाच्या तपासात

त्यांचा  सहभाग नसल्याचे निष्पन्न झाले आहे.
(६)  प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महिलांवरील अत्याचारांच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी आंध्र प्रदेशच्या धर्तीवर कायदा प्रस्तावित करण्याबाबत

**(४२) १४४२० (१३-०९-२०२०). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिलांवरील अत्याचारांच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी आंध्र प्रदेश राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्रातही नवीन कायदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कायद्याचे प्रारूप विधेयक  तयार करण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, सदर विधेयक विधिमंडळाच्या आगामी अधिवेशनामध्ये संमतीसाठी आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१२-०२-२०२१) :** (१)  होय, हे खरे आहे.

(२) होय, हे ही खरे आहे.

(३) व (४) शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०२० विधेयक क्र. ५१ व शक्ती विधेयकाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र अनन्य विशेष न्यायालये अधिनियम, २०२० विधेयक क्र. ५२ हे सन २०२० च्या हिवाळी अधिवेशनात विधीमंडळाच्या संमतीसाठी सादर करण्यात आले होते. विधीमंडळाने विधेयक क्र. ५१ मा. गृह मंत्री यांच्या अध्यक्षतेखालील दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यीय संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविले आहे.

---

## चंद्रपूर जिल्हयातील गोंडपीपरी मार्गावर बीटी बियाणे जप्त केल्याबाबत.

**(४३) १४५८४ (१४-०९-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.राजू कारेमोरे (तुमसर), श्री.इंद्रनिल नाईक (पुसद) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील गोंडपीपरी मार्गावर सुमारे २६ लक्ष रुपये चोरीचे बीटी बियाणे जप्त केल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून मेघना व अरुणोदया हया कंपन्याचे सदरहू २६ लाखांचे बीटी बियाणे असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी विभागाने सदरहू बीटी बियाणे योग्य अथवा अयोग्य असल्याची तपासणी केली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित कंपन्या या परराज्यांतील

असून या कंपन्यांविरुध्द संबंधित राज्याने कारवाई होणेकरीता शिफारस केली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०४-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय,

सदर बियाण्याची बीटी प्रथिने व एच.टी.बी.टी. बाबत बियाणे प्रयोगशाळेत तपासणी केली असता तिन्ही वाणांमध्ये एच.टी.बी.टी. आढळुन आलले आहेत.

(३) होय,

भरारी पथकाद्वारे चंद्रपूर जिल्ह्यातील मुल तालुक्यात बेंबळ येथे मुल-गोंडपिपरी मार्गावर, कृषि विभाग व पोलीस विभाग यांनी अनधिकृत एच.टी.बी.टी. कापूस बियाणे वाहतुक करणारा ट्रक ताब्यात घेतलेला आहे.

सदर ट्रक मधील कापसाच्या बियाणे पाकीटावर उत्पादकाचे नाव, पत्ता व इतर आवश्यक माहितीचा उल्लेख नाही. तसेच सदर बियाणे अनधिकृत आढळून आल्याने पोलीस स्टेशन मूल, जि.चंद्रपूर येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणातील आरोपी गुजरात राज्यातील असल्याचे पोलीस तपासात आढळून आल्याने या सदंर्भात योग्य ती कार्यवाही करणेबाबत कृषि संचालक, कृषि विभाग, गुजरात यांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मौजे गल्ले बोरगाव (ता.खुलदाबाद, जि.औरंगाबाद) येथे मका संशोधन केंद्र मंजुरीबाबत

**(४४) १४८६६ (२६-१०-२०२०). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गल्ले बोरगाव (ता.खुलदाबाद, जि.औरंगाबाद) येथे वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत मका संशोधन केंद्र स्थापन करण्याचा प्रस्ताव शासन स्तरावर मकृवि. १२१३ / प्रक्र १०१/ ८ ए, सन २०१२ - २०१३ पासून मान्यतेसाठी सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू केंद्र शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्वाचे असुन सर्वात जास्त मका मराठवाडयात असताना उक्त प्रस्तावास मान्यता मिळण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या मान्यतेस विलंब करणाऱ्या अधिकारी यांचेवर दफ्तर दिरंगाई सेवा हमी कायदा अंतर्गत शासनाने कोणती कारवाई केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रस्तावास मान्यता देऊन मौजे गल्ले बोरगाव येथे मका संशोधन केंद्र सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१९-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) मौजे गल्ले बोरगाव (ता.खुलदाबाद, जि.औरंगाबाद) येथे वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत मका संशोधन केंद्र स्थापन करण्याच्या प्रस्तावावर नियोजन विभागाच्या मान्यतेनंतर वित्त विभागाकडुन वारंवार उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांबाबत या विभागाकडून वेळोवेळी पुर्तता करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत वित्त विभागामार्फत उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचेकडुन अहवाल मागविण्यात आलेला आहे. त्यामुळे दिरंगाईबाबत कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) मौजे गल्ले बोरगाव येथे मका संशोधन केंद्र सुरु करण्याबाबतच्या प्रस्तावावर, वित्त विभागामार्फत उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचेकडुन अहवाल मागविण्यात आलेला आहे

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोरोना प्रादुर्भावामुळे मासेमारी व्यवसाय बंद असल्याने आर्थिक सहाय्य करणेबाबत

**(४५) १५४६६ (२३-११-२०२०). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊनमुळे कोकणातील मासेमारी व्यवसाय सुमारे ८ महिन्यांहून अधिक काळ पूर्णपणे बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लॉकडाऊन जाहीर होण्याआधी समुद्रात मासेमारीसाठी गेलेल्या बोटींवरील मासे समुद्रात फेकून देण्याची वेळ आल्याने मच्छीमारांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असुन दिनांक २० एप्रिल, २०२० रोजी वा त्यासुमारास शासनाने मासेमारीसाठी विशेष सुट दिली असताना बोटीसाठी लागणारे डिझेल, पेट्रोल, बर्फ याची व्यवस्था बंदरांवर नसल्यामुळे मासेमारी होवू शकली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे सप्टेंबरपर्यंत मासेमारीवर असलेली बंदी आणि ही बंदी संपल्यानंतरही सततच्या अतिवृष्टीमुळे मासेमारी बंद राहिल्यामुळे मच्छीमार आर्थिक संकटात असल्याने मच्छीमारांना आर्थिक सहाय्य करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ८ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख (०८-०२-२०२१) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) क्यार व महा वादळाच्या पार्श्वभुमिवर मच्छीमारांना पूर्णक्षमेतेने मासेमारी करता न आल्यामुळे दि.०९ सप्टेंबर २०२० च्या शासन निर्णयानुसार विशेष आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आळंदी - पंढरपुर - मोहोळ (राष्ट्रीय महामार्ग क्र.९६(५) या महामार्गाच्या भू-संपादनामध्ये शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याबाबत**

**(४६) १६२९४ (२३-११-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.राजेश पाडवी (शहादा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आळंदी - पंढरपुर - मोहोळ (राष्ट्रीय महामार्ग क्र.९६(५) या महामार्गाच्या भू-संपादनामध्ये माळशिरस (जि.सोलापूर) नगरपंचायत हद्दीमधील भू-संपादन निवाड्यामध्ये प्रत्येक गटाचा वेगवेगळ्या बाजारभावाने निवाडा केला असून काही गटांना प्रति चौ.मी .५५१ रुपये व गुणांक १ लावुन २ पट म्हणजे प्रतिगुंठा १,१०,२००/- रुपये मोबदला देवुन चुकीचा निवाडा मंजुर केला असल्याने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजे येळीव (ता.माळशिरस) या ग्रामपंचायतीमध्ये भू-संपादन निवाडा मंजुर करताना त्या गावातील जमिनीचा बाजारभाव प्रति चौ.मी.९४०/- रुपये व गुणांक २ लावुन ४ पट म्हणजेच प्रतिगुंठा ३,७६,०००/- रुपये मोबदला मंजुर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माळशिरस हे तालुक्याचे ठिकाण असताना येथील शेतकऱ्यांच्या जमिनीला ग्रामपंचायत क्षेत्रापेक्षा कमी बाजारभावाने मोबदला देऊन भू-संपादन कायदा, २०१३ चे उल्लंघन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करून शेतकऱ्यांना योग्य दराने मोबदला देऊन संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (०४-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, माळशिरस यांचेकडे श्री.संत ज्ञानेश्वर महाराज पालखी महामार्गावरील एकूण २० गावांतील जमीन भूसंपादन प्रक्रिया चालू आहे.त्यापैकी मौजे माळशिरस गावचा नवीन भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम क्र.२६ ते ३० व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या मार्गदर्शक सूचना अनुसरून निवाडा तयार केला असून त्या निवाड्यास प्रकल्प संचालक यांचेकडून दि.०९.०९.२०१९ रोजी मान्यता मिळाली आहे.सदर निवाड्यानुसार एकूण क्षेत्र १३.७२ हे.आर अधिग्रहित व रक्कम रु. २८.२५ कोटी नुकसान

भरपाई रक्कमही वाटप करणेत आलेली आहे.सदर निवाड्यामध्ये भूसंपादित होणारे क्षेत्र हे बाह्यवळण रस्त्याने बाधित होत असून शेती विभाग, रहिवास विभाग, बिनशेती क्षेत्र अशा प्रकारच्या जमिनीचा त्यात समावेश होत आहे.सबब, सदर जमिनीचे मूल्यांकन प्रचलित शासन निर्णय व नवीन भूसंपादन कायद्यातील कलम २६ ते ३० अन्वये करणेत आलेले आहे.

(२) हे खरे आहे.

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, सहायक संचालक नगररचना , सोलापूर यांचेकडील पत्र जा.क्र./भूसंपादन निवाडा / खाजगी वाटाघाटी / ता.मोहोळ /ससंनर-सो / ४९९(४) दि.२९.११.२०१८ च्या पत्रानुसार मौजे येळीव या गावास शेतीविभाग गुणांक २, गावठाणातील मिळकती गुणांक १.५ कळविणेत आला असल्याने गुणांक २ लागू असल्याने त्याप्रमाणे निवाडा मंजूर करण्यात आला आहे.येळीव मध्ये संपादित होणाऱ्या जमिनी महामार्गालगत असलेने महामार्गालगतच्या जमिनीचा शीघ्रसिद्धगणक रु.९४० प्रति चौ.मी.प्रमाणे असून तो दर निवाड्यात समाविष्ट करणेत आलेला आहे.

(३) हे खरे नाही. मौजे माळशिरस मध्ये संपादित क्षेत्र हे बाह्यवळण रस्त्याने बाधित होत असलेने सदर संपादित क्षेत्रातील समगदूर जमिनींचे राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ कलम ३(A) अन्वये प्रसिद्ध अधिसूचनेच्या ३ वर्षे पूर्वीच्या काळातील खरेदी-विक्री व्यवहार व सदर जमिनींचे शीघ्रसिद्धगणक यांचा विचार करून निवाड्यात मुल्यांकन करणेत आलेले आहे.नवीन भूसंपादन कायदा २०१३ मधील तरतूदींचा अवलंब करूनच सदर निवाडा तयार करणेत आला असून सदर निवाड्यास भूसंपादन मंडळ तथा NHAI मंजुरी प्राप्त आहे.सबब, या कामी कोणत्याही कायदेशीर तरतूदींचे उल्लंघन झालेले नाही.

(४) संबंधित जमिनींचे मालक शेतकरी यांनी मौजे माळशिरस मध्ये संपादित होणाऱ्या जमिनींच्या निवाड्या विरोधात राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ मधील कलम ३(G)५ अन्वये लवाद तथा अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे अर्ज केले असून सदर बाबींवर सुनावणी सुरू आहे.सबब,सदर बाब ही न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पालेगाव (ता.अंबरनाथ,जि.ठाणे) येथील आर. मार्ट जवळ झालेली हत्या

**(४७) १७५६० (२४-११-२०२०). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालेगाव (ता.अंबरनाथ,जि.ठाणे) येथील आर. मार्ट जवळ दिनांक २८ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास सहा हल्लेखोरांनी अंबरनाथ येथील राजकीय पक्षाचे शहर उपाध्यक्ष श्री. राकेश पाटील यांच्यावर धारदार शस्त्राने अनेक वार केल्याने उपचारासाठी कल्याण येथील रुग्णालयात नेत असताना त्यांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबरनाथ येथील पटेल बिल्डर व त्यांच्या गुंडांकडून ही हत्या केल्याचा आरोप संबंधित राजकीय पक्षाकडून व्यक्त करण्यात आला असून पटेल बिल्डर तसेच त्यांचे गुंड व प्रत्यक्षात हत्या करणारे सर्व गुन्हेगारांविरोधात विनाविलंब कारवाई करण्याची मागणीही

त्या पक्षाने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१६-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २५१/२०२० भा.दं.वि. कलम ३०२, १२०(ब), ३२४, १४३, १४७, १४९ सह भा.ह.का. कलम ४, २७ सह म.पो.का.क. ३७(१) १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यामध्ये केलेल्या तपासाच्या अनुषंगाने आठ आरोपिंना अटक करण्यात आली असून त्याव्यतिरिक्त अन्य आरोपीचा सहभाग असल्याचे आढळून आल्यास त्यांचेवर योग्य कायदेशीर कारवाई करण्याची दक्षता घेण्यात येत असून सदर गुन्ह्याचा सखोल तपास चालू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नालासोपारा पूर्वेकडील मोरेगांव येथे अनधिकृत इमारत उभारल्याबाबत**

**(४८) १७८०२ (२४-११-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नालासोपारा पूर्वेकडील मोरेगांव येथील सर्वे क्र. १९० मधील हिस्सा क्र.३ मध्ये ओम साई डेव्हलपर्सतर्फे साई छाया फेस-१ ही अनधिकृत इमारती बनावट कागदपत्रांच्या सहाय्याने उभारण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर,२०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असलयास, उक्त अनधिकृत इमारतीमधील सदनिका विक्री करुन ग्राहक आणि शासनाची फसवणूक केली असून यासदंर्भात तुळींज पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. अनिल देशमुख (११-०२-२०२१) :**(१) व (२) होय
याबाबत तुळींज पोलीस ठाणे गु.र.नं.९२७/२०२० नुसार दिनांक २४.१०.२०२० रोजी गुन्हा दाखल केला आहे.

(३) व (४)

सदर गुन्ह्यातील दोषींविरुध्द गुन्हा दाखल करुन आरोपींना अटक करण्यात आलेली असून गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर येथे कृषी विद्यापीठाची स्थापना करणेबाबत**

**(४९) १७८९६ (२३-११-२०२०). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर, सांगली, सातारा व सोलापूर हया जिल्हयांसाठी कोल्हापूर येथे कृषि विद्यापीठाची स्थापना करण्याची मागणी मागील ३० ते ३५ वर्षापासून होत असून याबाबत स्थानिक खासदार व आमदार यांनी मा.कृषी मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा व सोलापूर हया जिल्हयांमध्ये आधुनिक पध्दतीने शेती करण्यात येत असून शेतीचे उत्पन्न सरासरीपेक्षा अधिक आहे, परंतु उक्त जिल्हे हे राहूरी कृषि विद्यापीठ, अहमदनगर अंतर्गत येत असुन याठिकाणी विद्यापीठाकडून कोणतीही कार्यवाही होताना निदर्शनास येत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राहूरी विद्यापीठ अंतर्गत कोल्हापूर जिल्हयामध्ये शेतीविषयक प्रयोग व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणेबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याने कोल्हापूरसह अन्य जिल्हयांतील शेतकऱ्यांना कोणताही लाभ मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, निवेदनाव्दारे केलेल्या मागणीच्या अनुषंगाने कोल्हापूर येथे नव्याने कृषी विद्यापीठाची स्थापना करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२७-०१-२०२१) :** (१) होय, हे अशंत: खरे आहे.

डॉ. एस.आर.पुणतांबेकर, निमंत्रक, प्रस्तावित कृषि विद्यापीठ, कोल्हापूर यांचे निवेदन माहे ऑगस्ट, २०२० मध्ये शासनास प्राप्त झाले आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा व सोलापूर या जिल्हयांमध्ये या विद्यापीठाच्या अधिनस्त असलेल्या कृषि महाविद्यालये, संशोधन केंद्र इ. मार्फत उत्पादन वाढीचे कार्य निरंतर चालु आहे.

(३) नाही, हे खरे नाही.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत विभागीय विस्तार केंद्र, कृषि विज्ञान केंद्रे आणि महाराष्ट्र शासन कृषि विभाग यांच्याद्वारे कोल्हापूर जिल्हयामध्ये कार्यरत असणाऱ्या

संशोधन योजनांमार्फत तंत्रज्ञान प्रचार व प्रसार कार्य होत आहे.

(४) कोल्हापूर येथे स्वतंत्र कृषि विद्यापीठ स्थापन करण्याबाबत दि.५/९/२०१३ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झालेला प्रस्ताव, दि. १९/८/२०१३ च्या शासन निर्णयान्वये गठित करण्यात आलेल्या डॉ.वाय. एस.पी. थोरात, समिती समोर विचारार्थ ठेवण्याबाबत कृषि परिषद, पुणे कार्यालयास शासनाच्या दि.१३/११/२०१३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. सदर समितीने दि.६/१/२०१५ च्या पत्रान्वये राहुरी कृषि विद्यापीठाचे विभाजन करुन उत्तर महाराष्ट्राकरीता स्वतंत्र कृषि विद्यापीठ स्थापन करण्यासारखी परिस्थिती असल्याचा अहवाल शासनास सादर केला आहे.

तद्नंतर शासन निर्णय दि.१४.५.२०१५ अन्वये गठित करण्यात आलेल्या डॉ. वेंकटेश्वरलु समितीने महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी विद्यापीठाचे विभाजन करुन नवीन विद्यापीठ स्थापन करण्याची शिफारस केलेली आहे.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## राहुरी विद्यापीठात ८५ कोटी रुपयांचा झालेला गैरव्यवहार

**(५०) १८४२३ (२७-११-२०२०). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राहुरी विद्यापीठात सन २०१४-२०१९ या कालावधीत तत्कालीन शासनाने सुमारे ८५ कोटी रुपयांची कामे देताना नियमात बदल करुन ठराविक ठेकेदारांच्या १५ टक्के वाढीव दराच्या निविदा मंजूर करून गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी श्री. सुभाष मोरे यांनी मा. मुख्यमंत्री व कृषि मंत्री यांच्याकडे लेखी तक्रार करून या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित दोषी विरोधात कारवाई करण्याची मागणी माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ठेकेदारांनी निविदा दाखल करण्यापूर्वी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी भेट देऊन विद्यापीठ अभियंत्याकडून तसा अहवाल द्यावा अशी अट टाकण्यात आली असुन अशी तक्रार यासंदर्भातील निवेदनात नमूद केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्याचे निष्कर्ष काय आहेत,

(५) असल्यास, त्यानुषंगाने सदरहू गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२८-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) श्री.सुभाष गोरे यांनी मा. मुख्यमंत्री व कृषि मंत्री यांच्याकडे सादर केलेल्या निवेदनातील तक्रारीच्याअनुषंगाने चौकशी करुन अहवाल शासनास सादर करण्याबाबत महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

(६) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.